# बृहन्मुंबई महानगरपालिका



# दीपस्तंभ

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन !

जनसंपर्क विभाग । वर्ष - २०२५

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या नागरी सेवा-सुविधा

१) छत्रपती शिवाजी महाराज मैदानात (शिवाजी पार्क) मंडप आणि व्ही. आय. पी. कक्षासह नियंत्रण कक्षाची व्यवस्था.
२) नियंत्रण कक्षाशेजारी, तोरणा प्रवेशद्वाराजवळ व सूर्यवंशी सभागृह मार्गासह विविध ठिकाणी रुग्णवाहिकेसहित आरोग्यसेवा.
३) १ लाख चौरस फूट क्षेत्रफळाच्या मंडपात तात्पुरता निवारा.
४) मैदान व परिसरात तसेच रांगेत असणाऱ्या अनुयायांसाठी फिरती शौचालये.
५) छत्रपती शिवाजी महाराज मैदान (शिवाजी पार्क) आणि चैत्यभूमी परिसरात महिलांकरिता 'स्वतंत्र प्रसाधनगृह' व्यवस्था.
६) छत्रपती शिवाजी महाराज मैदानात (शिवाजी पार्क) पिण्याच्या पाण्यासाठी आरओ वॉटर प्युरिफायरची व्यवस्था.
७) पिण्याच्या पाण्याच्या नळांची व्यवस्था, रांगेत व परिसरात असणाऱ्या अनुयायांसाठी पिण्याच्या पाण्याचे टँकर्स.
८) कर्मचारी व विविध संयंत्राद्वारे संपूर्ण परिसरात स्वच्छता.
९) संपूर्ण परिसरात विद्युत व्यवस्था आणि मोबाईल चार्जिंगकरिता व्यवस्था.
१०) मुंबई अग्निशमन दलामार्फत आवश्यक त्या सेवांसह चैत्यभूमीलगतच्या चौपाटीवर जीव रक्षकांसहीत बोटीची व्यवस्था.
११) चैत्यभूमी स्मारकातील अभिवादनाचे मोठ्या पडद्यांवर थेट प्रक्षेपण.
१२) छत्रपती शिवाजी महाराज मैदानात (शिवाजी पार्क) स्टॉल्सची रचना.
१३) स्काऊट गाईड हॉल येथे भिक्खू निवासाची व्यवस्था.
१४) मैदानात धुळीचा त्रास रोखण्याकरिता पायवाटांवर आच्छादनाची व्यवस्था.
१५) मैदान व चैत्यभूमी येथे अनुयायांना मार्गदर्शनाकरिता १०० फूट उंचीवर स्थळ निदर्शक फुग्याची व्यवस्था.
१६) तात्पुरत्या स्नानगृहांची व तात्पुरत्या प्रसाधनगृहांची व्यवस्था.
१७) इंदू मिलच्या मागे प्रसाधनगृहे व स्नानगृहे आदी व्यवस्था.
१८) रांगेतील अनुयायांसाठी तात्पुरते छत व बसण्यासाठी बाकड्यांची सोय.
१९) महिला व नवजात बालकांकरिता चैत्यभूमी व छत्रपती शिवाजी महाराज मैदान (शिवाजी पार्क) येथे हिरकणी कक्षाची सुविधा.
२०) महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर माहिती पुस्तिकेचे मोफत वितरण.
२१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, वडाळा आणि 'जी दक्षिण' विभागात माता रमाई भीमराव आंबेडकर स्मारक परिसरात शौचालये, स्नानगृहे, पिण्याचे पाणी, वैद्यकीय कक्ष आदी व्यवस्था.
२२) दादर (पश्चिम) रेल्वे स्थानकाजवळ आणि दादर (पूर्व) स्वामीनारायण मंदिराजवळ नियंत्रण कक्ष, माहिती कक्ष, फिरती शौचालये, स्नानगृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि वैद्यकीय कक्ष.
२३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निवासस्थान 'राजगृह' येथे नियंत्रण कक्ष आणि वैद्यकीय कक्ष.
२४) 'एल' विभाग - लोकमान्य टिळक टर्मिनस, कुर्ला येथे नियंत्रण कक्ष, आरोग्य सेवा कक्ष व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था.
२५) 'एम' पश्चिम विभाग - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, चेंबूर येथे आवश्यक ती व्यवस्था.
२६) 'आर' मध्य विभाग- गोराई येथील ग्लोबल पॅगोडा परिसरात अत्यावश्यक नागरी सेवा-सुविधा.

- **चैत्यभूमी स्मारक येथे शासकीय मानवंदना.**
- **चैत्यभूमी स्मारकावर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी.**

**महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमीचे प्रक्षेपण पाहण्यासाठी खाली दर्शविलेला 'क्यू आर कोड' किंवा 'समाज माध्यमांचा' (सोशल मीडिया) कृपया उपयोग करावा.**

**ही पुस्तिका डाऊनलोड करण्यासाठी खालील 'क्यू आर कोड' स्कॅन करा.**

mybmcmymumbai

mybmc

mybmc

**विनायक विसपुते**
सहायक आयुक्त ( 'जी' उत्तर विभाग)
दूरध्वनी : ६९५१ ७८००

**प्रशांत सपकाळे**
उप आयुक्त ( परिमंडळ - २)
दूरध्वनी : २४१५ ०४००

**डॉ. अश्विनी जोशी**
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर)
दूरध्वनी : २२६२ ०४३३

# बाबासाहेबांचे तीन गुरू



तथागत भगवान गौतम बुद्ध



संत कबीर



महात्मा जोतिबा फुले

" माझे आयुष्य तीन गुरू आणि तीन उपास्य दैवतांनी घडले आहे.
माझे पहिले आणि श्रेष्ठ गुरू 'तथागत भगवान गौतम बुद्ध' होत. माझे दुसरे गुरू 'संत कबीर'
आणि तिसरे गुरू म्हणजे 'महात्मा जोतिबा फुले' होत... माझी तीन उपास्य दैवतेही आहेत.
पहिले दैवत 'विद्या', दुसरे दैवत 'स्वाभिमान' आणि तिसरे दैवत म्हणजे 'शील' होय."

-डॉ. बाबासाहेब आंबेडकर (मुंबई,१९५४).

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शैक्षणिक प्रवास

१८९१ : महू, मध्य प्रदेश येथे सैनिक छावणीत जन्म (१४ एप्रिल).

१८९४ : वडील सुभेदार रामजी सकपाळ यांनी भीमरावांचे नाव सातारा येथील प्राथमिक शाळेत नोंदविले.

१९०० : सरकारी सातारा हायस्कूल (आताचे प्रतापसिंग हायस्कूल) येथे इंग्रजी पहिलीत प्रवेश (७ नोव्हेंबर). या शाळेत असताना कृष्णाजी केशव आंबेडकर (१८५५-१९३४) या शिक्षकाने भीमरावांचे 'आंबावडेकर' हे आडनाव बदलून स्वतःचे 'आंबेडकर' हे आडनाव त्यांना दिले.

१९०४ : सातारा हायस्कूलमधून इंग्रजी ४ थी परीक्षा उत्तीर्ण.

१९०७ : मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण.

१९०८ : एल्फिन्स्टन महाविद्यालयात प्रिव्हियसच्या वर्गात प्रवेश घेतला (८ जानेवारी).

१९१० : इन्टरमीडिएट परीक्षा उत्तीर्ण.

१९११ : सयाजीराव गायकवाड यांनी महाविद्यालयीन शिक्षणासाठी दरमहा २५ रुपयांची शिष्यवृत्ती देण्याचे अभिवचन दिले.

१९१३ : मुंबई विद्यापीठाची बी. ए. पदवी परीक्षा उत्तीर्ण.

१९१३ : सयाजीराव गायकवाड यांनी विदेशात अध्ययनासाठी शिष्यवृत्ती प्रदान केली (४ एप्रिल).

१९१३ : न्यूयॉर्क येथील कोलंबिया विद्यापीठातील राज्यशास्त्र शाखेत प्रवेश घेतला.

१९१५ : 'ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड फायनान्स ऑफ द ईस्ट इंडिया कंपनी' या प्रबंधासह एम. ए. पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले (२ जून).

१९१६ : द नॅशनल डिव्हिडंड ऑफ इंडिया : 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पॉलिटिकल सायन्स' या संस्थेत मास्टर ऑफ सायन्स (इकॉनॉमिक्स) आणि डॉक्टर ऑफ सायन्स (इकॉनॉमिक्स) या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतला. त्याच वेळी त्यांनी बॅरिस्टर ॲट-लॉ या उपाधीसाठी 'ग्रेज- इन' संस्थेत प्रवेश घेतला.

१९१६ : 'अ हिस्टॉरिकल अँड ॲनालिटिकल स्टडी' प्रबंध कोलंबिया विद्यापीठाद्वारे स्वीकृत.

१९१६ : पीएच. डी. पदवी बहाल.

१९१७ : बडोदे सरकारने दिलेल्या शिष्यवृत्तीची मुदत संपल्याने आपला अभ्यासक्रम सोडून भारतात परतावे लागले. (२१ ऑगस्ट)

१९१८ : सिडनहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नियुक्ती (११ नोव्हेंबर).

१९१९ : राजर्षी शाहू महाराज यांच्या सहाय्याने 'मूकनायक' पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित (३१ जानेवारी)

१९२० : अपूर्ण राहिलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्यास लंडनला रवाना (५ जुलै).

१९२० : 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पॉलिटिकल सायन्स' आणि 'ग्रेज- इन' संस्थांमध्ये पुन्हा प्रवेश घेतला (३० सप्टेंबर).

१९२२ : बॅरिस्टरची परीक्षा उत्तीर्ण (२८ जून)

१९२३ : 'द प्रॉब्लेम ऑफ द रुपी' या प्रबंधाकरिता लंडन विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ सायन्स' उपाधी प्रदान केली (नोव्हेंबर).

१९२३ : मुंबई उच्च न्यायालयात वकिलीच्या व्यवसायास सुरुवात केली (५ जुलै).

१९२३ : लंडन विद्यापीठाने 'डी. एस्सी.' उपाधी प्रदान केली. (नोव्हेंबर)

१९२४ : 'दि इव्होल्यूशन ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया' या प्रबंधाकरिता कोलंबिया विद्यापीठाने पीएच. डी. पदवी प्रदान केली.

१९३४ : मुंबईच्या शासकीय विधी महाविद्यालयात अर्धवेळ प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली. (जून)

१९३७ : मुंबई विधीमंडळात सदस्य म्हणून निवड.

१९४२ : भारताच्या व्हाइसरॉय लिनलिथगो यांच्या नेतृत्वाखालील कार्यकारी मंडळात समावेश झाला. (२ जुलै).

१९४२ : भारताचे मजूरमंत्री म्हणून कामकाज पाहण्यास सुरुवात (५ जुलै).

१९५६ : दिल्लीतील २६, अलिपूर मार्ग येथील निवासस्थानी महापरिनिर्वाण (६ डिसेंबर).



घटना समितीने नेमलेल्या घटना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र भारताच्या घटनेचा अंतिम मसुदा हा घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांना सुपूर्द केला, तो २५ नोव्हेंबर १९४९ चा ऐतिहासिक क्षण.

" शिक्षण हा ज्ञानाचा आणि प्रगतीचा पाया आहे. यामुळे आत्मसन्मान वाढतो आणि समाजात समान स्थान मिळवता येते."



# ‘दीपस्तंभ’- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**ज्ञान, समता आणि न्यायाच्या प्रकाशाने संपूर्ण जग तेजोमय करणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विनम्र अभिवादन !**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी दरवर्षी ६ डिसेंबर रोजी देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो अनुयायी मुंबईतील दादर येथील चैत्यभूमीवर येतात. त्यांना नागरी सेवा- सुविधा देण्याचे महत्त्वाचे कार्य पालक संस्था या नात्याने बृहन्मुंबई महानगरपालिका गत अनेक वर्षांपासून योग्यप्रकारे पार पाडत आहे. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) या नात्याने या सेवाकार्यात सहभागी होण्याची संधी यंदा आम्हाला दुसऱ्यांदा लाभत आहे. ही आमच्यासाठी खरोखरच एक समाधानाची बाब आहे.

देशभरातून येणाऱ्या अनुयायांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि सर्व यंत्रणा अविरतपणे कार्यरत आहे. रांगेतील अनुयायांसाठी तात्पुरते छत व आसनव्यवस्था, निवासी मंडप, चैत्यभूमी व परिसरात दिशादर्शक फलक, मैदानातील धूळ-प्रतिबंधक उपाययोजना, स्वच्छता सेवा, वैद्यकीय सुविधा, भोजन व्यवस्थापन, पूज्य भन्तेजींसाठी ध्यान-साधना कक्ष, पिण्याच्या स्वच्छ पाण्याची व्यवस्था, फिरती स्वच्छतागृहे, विद्युतव्यवस्था, अग्निशमन दल, मोबाईल चार्जिंग अशा सर्व सेवा-सुविधा महानगरपालिका सक्षमपणे उपलब्ध करून देत आहे.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त केलेल्या व्यवस्थेसह सेवा -सुविधांची माहिती प्रस्तुत पुस्तिकेत समाविष्ट आहे. यासोबतच समाजातील शिक्षित, होतकरू, अभ्यासू आणि कष्टाळू युवकांनी शासकीय नोकरीची योग्य संधी कशी शोधावी, त्यासाठी काय करावे, याबाबत माहिती मिळावी या उद्देशाने यावर्षी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जनसंपर्क विभागाने ‘दीपस्तंभ’ या अभ्यासपूर्ण पुस्तिकेतून शासकीय शिष्यवृत्ती, विविध कल्याणकारी शैक्षणिक योजनांची, नोकरीभिमुख अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. शासकीय नोकरीसाठीच्या महत्त्वाच्या संकेतस्थळांबाबतची माहिती या पुस्तिकेत देण्यात आली आहे. त्याचबरोबर बाबासाहेबांच्या प्रेरक भाषणांचा व मार्गदर्शनाचा समावेश या पुस्तिकेत करण्यात आला आहे. ही पुस्तिका युवकांना निश्चितच मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरेल, असा आम्हाला विश्वास वाटतो.

**डॉ. अश्विनी जोशी**
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर)

**भूषण गगराणी**
महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक



“ गुणभेदाचे अंतर नाहीसे झाले पाहिजे, त्यासाठी शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे.”



# जनसागराच्या सेवेसी...

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी अभिवादन करण्यासाठी मुंबईतील दादर चैत्यभूमी स्मारकावर लाखो अनुयायी दरवर्षी ६ डिसेंबर रोजी येतात. बाबासाहेबांचा प्रत्येक अनुयायी चैत्यभूमीवरुन परतताना त्यांचे विचार, कार्य आणि संदेश पुस्तिकेच्या स्वरुपात आपल्या ओंजळीत घेवून जातो. अरबी समुद्राची अथांगता आणि चैत्यभूमीहून मिळणारे डॉ. बाबासाहेब यांचे अक्षय विचार गाठीशी घेऊन हे अनुयायी श्रद्धामय आणि ज्ञानमय होवून परततात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिनांक ६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्ली येथे महापरिनिर्वाण झाले आणि दिनांक ७ डिसेंबर १९५६ रोजी मुंबईतील दादर चौपाटीच्या किनाऱ्यावर डॉ. बाबासाहेबांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या दिवशी दादर चौपाटी येथे उपस्थित दहा लाख अनुयायी भावनाविवश झाले होते. चैत्यभूमीवर येणाऱ्या अनुयायांना प्रत्येक वर्षी नागरी सेवा-सुविधा मिळाव्यात आणि चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदान परिसरातील रहिवासी, मैदानावर सरावासाठी येणारे खेळाडू, दादरमधील व्यावसायिकांनाही त्रास होणार नाही, याची खबरदारी बृहन्मुंबई महानगरपालिका घेत असते. महानगरपालिकेकडून मिळणाऱ्या सुविधांचे हे पर्व कुठून, केव्हा आणि कसे सुरू झाले हे जाणून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रतिवर्षी लाखो अनुयायी चैत्यभूमीवर येतात. या अनुयायांसाठी नागरी सेवा-सुविधा पुरविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका सदैव तत्पर आहे. जसजशी चैत्यभूमीवर येणाऱ्या अनुयायांची संख्या वाढत गेली, तसतशी सेवा-सुविधांमध्येही वाढ होत गेली. बाबासाहेबांवरील श्रद्धेने लाखोंच्या संख्येने येणाऱ्या अनुयायांना सुविधा पुरविताना चैत्यभूमी, दादर परिसरातील रहिवाशांच्या रोजच्या कामकाजात व्यत्यय येणार नाही, याचीही काळजी महानगरपालिका प्रशासन दरवर्षी घेत असते. किंबहुना अनुयायांना देण्यात येणाऱ्या सुविधा आणि स्थानिकांचे सुरळीत जनजीवन यातील सुवर्णमध्य साधण्यासाठी महानगरपालिका सातत्याने प्रयत्न करीत आली आहे.

सन १९५६ नंतर प्रत्येकाचं चैत्यभूमीशी एक वेगळं नातं निर्माण होत गेलं. त्यांच्यासाठी चैत्यभूमी म्हणजेच बाबासाहेब. कधीकाळी आजोबांचे बोट धरुन चैत्यभूमीवर येणारा नातू काही वर्षांनंतर नव्या पिढीसोबत येथे येवू लागला. आता तर त्याच्यासोबत उगवती पिढीही चैत्यभूमीची वाट धरू लागली आहे. देशभरात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे विचारांच्या प्रवाहाचे संक्रमण होवू लागले आणि हा प्रवाह काही कालावधीनंतर खूप मोठ्या जनसागरात रुपांतरीत होत गेला. कालांतराने अनुयायी, डॉ. बाबासाहेबांच्या ग्रंथसंपदेचा अभ्यास करणारे अभ्यासक, जाणकार, युवक, विद्यार्थी, परदेशातील अभ्यासक या जनसागरास मिळत गेले. साहजिकच या जनसागरासाठी निवारा, पिण्याचे पाणी, भोजन, आंघोळीसाठी पाणी, प्रात:विधीची सोय आदी बाबींचा विचार पुढे येवू लागला. त्यासाठी दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदान (पूर्वीचे शिवाजी पार्क) येथे निवाऱ्यांची सोय करण्यावर एकमत झाले. मुंबईची पालकसंस्था या नात्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून त्यासाठीचे नियोजन करण्यात आले.

जगभरातून मुंबई दर्शनासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या यादीत दादर चौपाटी, चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदान या ठिकाणांची नावे असतातच. यासोबतच छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे खेळाडू दररोज क्रिकेट, फुटबॉल, खो-खो, मल्लखांब, कबड्डी यासारख्या मैदानी खेळांचा सराव करतात. तसेच, काही ज्येष्ठ नागरिक येथे सकाळ-सायंकाळ फेरफटका मारण्यासाठी येत असतात. शिवाय, हा परिसर सतत गजबजलेला असतो. त्यामुळे पर्यटक, खेळाडू, ज्येष्ठ नागरिक यांच्या नित्यक्रमात कोणताही अडथळा न आणता महानगरपालिका प्रशासनाकडून महापरिनिर्वाण दिनाचे नियोजन आखण्यात आले. त्यावर अनेकांकडून सूचना आल्या, तक्रारीही आल्या. या सर्वांची योग्य दखल घेत हे चित्र पालटण्यास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली ती सन २००० पासून.

सन २००० पासून बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने अथक परिश्रम घेत चैत्यभूमी व छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे येणाऱ्या जनसामान्यांना व्यापक सुविधा देण्यावर भर दिला. तत्कालीन महापौर हरेश्वर पाटील, आयुक्त व्ही. रंगनाथन (सन २०००-२००१), तत्कालीन अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अजित कुमार जैन, तत्कालीन सहायक आयुक्त रमेश पवार यांच्या सहकार्याने आम्ही महापरिनिर्वाण दिनाच्या सूक्ष्म नियोजनावर भर दिला. त्यावेळी मी परिमंडळ दोनचा उप आयुक्त होतो. महानगरपालिकेने सन २००० च्या जानेवारी महिन्यापासूनच महापरिनिर्वाण दिनासाठी काम करणाऱ्या विविध संघटना, संस्था, समित्या यांच्यासोबत बैठका घेतल्या. लहानसहान गोष्टींवर चर्चा केली. त्यावर तोडगा काढला. या सगळ्यांचा परिपाक म्हणजे दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानात देशभरातून येणाऱ्या अनुयायांच्या निवासाची, पिण्याच्या पाण्याची, प्रसाधनगृहांची व अन्य व्यवस्था करण्यावर एकमत झालं. अर्थात छत्रपती शिवाजी महाराज मैदानात व्यवस्था उभी करणं हे तसं शिवधनुष्य पेलण्यासारखंच होतं. पण, पालकसंस्था या नात्यानं बृहन्मुंबई महानगरपालिकेने ते लीलया पेललं.

लाखो आंबेडकरी अनुयायांसाठी तात्पुरत्या स्वरुपात नागरी सेवा-सुविधा, त्यांना आंघोळीसाठी पाणी, तात्पुरती प्रसाधनगृह उभारणं, कोणाला काही दुखलं-खुपलं तर त्यासाठी आरोग्याची सुविधा उपलब्ध करून देणं या साऱ्या बाबींचे नियोजन करायचे असेल, तर त्यासाठी निधीही तितकाच हवा होता. परंतु महानगरपालिकेची यंत्रणा मागे हटली नाही. सेवाधर्म हेच एकमेव ध्येय घेवून पदाधिकारी आणि अधिकारी निघाले होते. 'आता थांबायचं नाही', असा विचार पक्का करून नियोजन करण्यात आले. या जनसेवेच्या यज्ञात अनेकांनी सहकार्याची समिधा अर्पण केली.

स्वतंत्र निधी उभारला गेला. अनेक संघटना, संस्था सहकार्यासाठी तयार झाल्या. आता समोर यक्ष प्रश्न होता तो छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर (शिवाजी पार्क) मंडप उभारायचा. तोही मैदानाच्या नैसर्गिक ठेवणीला हात न लावता. या मंडप उभारणीस त्याकाळी विरोध झाला. काहींनी नाराजी व्यक्त केली. मात्र, या सगळ्यांना प्रशासनाने विश्वासात घेत मंडप उभारण्याचे काम हाती घेतले. 'मंडपाचा एकही खांब क्रिकेटच्या खेळपट्टीवर नसेल', अशी खात्री खेळाडूंना आणि जिमखान्यांना देण्यात आली. खेळाडूंसाठी शिवाजी पार्क हा खूप जिव्हाळ्याचा विषय असल्याने प्रशासनाने तो अतिशय सजगतेने हाताळला. महापरिनिर्वाण दिनाच्या दुसऱ्याच दिवशी मैदान स्वच्छ आणि टापटीप दिसेल, असा विश्वास स्थानिकांना देण्यात आला. त्याकाळी सगळ्यांनी महानगरपालिकेला सहकार्य केलं आणि काम करणाऱ्या हातांमध्ये दहा हत्तीचं बळ संचारलं.

पण, तरीही एक समस्या उद्भवलीच. मैदानात उभारण्यात येणाऱ्या प्रसाधनगृहांच्या मलनिस्सारणाचं काय? असा प्रश्न विचारला गेला. महानगरपालिका प्रशासनाने यावरही तोडगा शोधून काढला. सदैव तत्पर असणाऱ्या यंत्रणेने रातोरात मैदानावर मलनिस्सारण वाहिनी टाकली. त्यानंतर ती मुख्य वाहिनीशी जोडण्यात आली. अवघ्या पाच ते सात दिवसांत सगळं काम पूर्ण झालं. त्यामुळे दुर्गंधी आणि मलनिस्सारणाचा प्रश्न मार्गी लागला. दिनांक ५ डिसेंबर २०००

या दिवशी चैत्यभूमी येथे लाखो अनुयायी आले. सगळीकडे सूक्ष्म नियोजनावर भर होता. मैदानावर कुठेही अस्वच्छता नव्हती, तात्पुरती प्रसाधनगृहं, शौचालये उभी होती. पिण्याच्या पाण्याची व्यवस्थाही नळांद्वारे करण्यात आली.

प्रत्यक्ष ६ डिसेंबर २००० ला सारं नियोजनाप्रमाणे पार पडलं. आलेल्या लाखो अनुयायांनाही नवीन सुविधांचा लाभ घेता आला. मुंबईतील एक रात्र त्यांच्यासाठी आरामदायी ठरली. प्रातर्विधीसाठीच्या पुरेशा सुविधा असल्याने देशभरातून आलेल्या अनुयायांसाठी महानगरपालिकेने दिलेल्या सुविधांबाबत समाधान व्यक्त केलं. महापरिनिर्वाण दिनानंतर ७ डिसेंबरचा दिवस उगवला. आता वेळ होती स्वच्छतेचा दिलेला शब्द पाळण्याची. स्थानिक रहिवासी ७ डिसेंबरला सायंकाळी पार्कात फेरफटका मारायला येण्याआधी आणि खेळाडूंनी मैदानात धाव घेण्यापूर्वी संपूर्ण मैदान चकाचक करण्यात आले. या नियोजनात 'जी उत्तर' विभागाचे तत्कालीन सहायक आयुक्त रमेश पवार यांच्या पुढाकाराने सर्व अभियंते, अधिकारी, कामगार तसेच कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. याच बरोबर विविध खात्यांचे अधिकारी, कामगार व कर्मचारी यांनी यात सहभाग घेतला. मुख्यतः घनकचरा व्यवस्थापन, आरोग्य विभाग, जल अभियंता, मलनि:सारण, मुंबई अग्निशमन दल आदींनी मोलाचा वाटा उचलला.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने महापरिनिर्वाण दिनानिमित्त केलेले नियोजन, व्यवस्थेची पाहणी करण्यासाठी देशभरातून अभ्यासक येतात. येथील व्यवस्था इतर ठिकाणीही सुरू कराव्यात, अशी मागणी करतात. बृहन्मुंबई महानगरपालिका या सेवापर्वांत भर घालण्यासाठी आलेल्या सूचना आणि सुधारणांचा विचार करून नावीन्यता शोधण्याचा प्रयत्न करीत आहे. महानगरपालिकेकडून दरवर्षी वैविध्य असलेल्या विषयांवर आधारित माहिती पुस्तिका तयार करून अनुयायांना मोफत वितरित केली जाते. चैत्यभूमी येथे छायाचित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात येतो. येथे येणाऱ्या अनुयायांसाठी निवारा मंडपात पंखे, पिण्याचे पाणी, भोजन व्यवस्था, मोबाईल चार्जिंग, प्रसाधनगृहं, आरोग्य तपासणी आदी सुविधा महानगरपालिका पुरवित असते. यासाठी तब्बल १० हजार कामगार, कर्मचारी या कालावधीत तीन सत्रांमध्ये तैनात असतात. चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदान, राजगृह आणि मुंबईतील ज्या-ज्या ठिकाणी बाबासाहेबांच्या आठवणी आहेत, अशा सर्व ठिकाणी देखील विशेष सुविधा पुरविण्यात येतात. या सर्व सेवा-सुविधांसाठी काहीही कमी पडणार नाही, याची खात्री बाळगली जाते. महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमीवर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात येते. यावेळी बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी माननीय राज्यपाल, माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, मंत्रीगण, महानगरपालिकेचे पदाधिकारी, अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर आदी उपस्थित राहतात.

सन १९५६ पासून सुरू झालेले सेवेचे हे पर्व आजही नव नवीन सुविधांसह सुरू आहे. येत्या ६ डिसेंबर रोजी आणि त्यापुढे या सेवापर्वाच्या सान्निध्यात असंख्य चेहरे विसावतील, बाबासाहेबांच्या विचारांशी एकरुप होतील. मोठ्या कष्टाने, सूक्ष्म नियोजनाने आणि सर्वांच्या सहकार्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेने जनसामान्यांच्या सेवेसाठी रोवलेले हे रोपटे आता बोधीवृक्षात रुपांतरित झाले आहे. देशभरातून येणारे अनुयायी जेव्हा जेव्हा या सेवारुपी वृक्षाच्या सावलीत विसावलेले दिसतील, तेव्हा तेव्हा महानगरपालिकेच्या 'यतो धर्मस्ततो जय:' या ब्रीद वाक्याचे स्मरण होत राहील...!

एस. एस. शिंदे
सेवानिवृत्त सह आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका

# सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना

| | | |
|---|---|---|
| १ | **भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती ( दहावी नंतरची शिष्यवृत्ती)** | |
| | **पात्रतेचे निकष** | विद्यार्थी हा अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील असावा.<br>विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी असावे.<br>विद्यार्थी शालांत परीक्षोत्तर व त्या पुढील शिक्षण घेत असलेला असावा.<br>विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा. |
| | **लाभाचे स्वरुप** | विद्यार्थ्यास निर्वाह भत्ता व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर मान्य बाबींवरील शुल्क मिळणार.<br>दरमहा रुपये २५० ते ७०० या दराने निर्वाह भत्ता.<br>वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दरमहा रुपये ४०० ते १३५० निर्वाह भत्ता |
| २ | **मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती** | |
| | **पात्रतेचे निकष** | विद्यार्थी अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील असावा.<br>विद्यार्थ्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा जास्त असावे.<br>विद्यार्थी शालांत परीक्षोत्तर व पुढील शिक्षण घेत असलेला असावा.<br>विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा. |
| | **लाभाचे स्वरुप** | शालांत परीक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना त्यांचे वय विचारात न घेता सर्व जिल्हा स्तरावरील मान्यता प्राप्त मॅट्रिकोत्तर (दहावी नंतरच्या ) शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर विहित केलेले शुल्क देण्यात येते. |
| ३ | **राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती** | |
| | **पात्रतेचे निकष** | इयत्ता १० वीमध्ये ७५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. ही शिष्यवृत्ती योजना इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये शिकणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालय व उच्च महाविद्यालयातील अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी आहे. |
| | **लाभाचे स्वरुप** | इयत्ता ११ वी आणि १२ वी साठी दरमहा ३०० (१० महिन्यांसाठी ३ हजार रुपये) |
| ४ | **व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता (विद्यावेतन)** | |
| | **पात्रतेचे निकष** | विद्यार्थी व्यावसायिक पाठ्यक्रमात प्रवेशित असावा.<br>विद्यार्थी भारत सरकारचा शिष्यवृत्तीधारक असावा.<br>भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेस जी उत्पन्नाची मर्यादा आहे, तीच उत्पन्न मर्यादा या योजनेस लागू राहील. |

**वरील योजनांबाबत अधिक माहितीसाठी https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.**

“ शिक्षण व राज्यसत्ता मिळविण्याकडे आपल्या बुद्धीचा व्यय करा. ”

| | | |
|---|---|---|
| ४ | **लाभाचे स्वरुप** | शिष्यवृत्तीद्वारे मिळणाऱ्या निर्वाह भत्त्यातून व्यावसायिक पाठ्यक्रमाची पुस्तके, शालेय साहित्य, निवास, भोजन इत्यादी बाबींचा खर्च भागविण्यात येतो. व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणा-या महाविद्यालयाच्या वसतिगृहात, शासकीय वसतिगृहात व इतर वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना भारत सरकारच्या शिष्यवृत्ती व्यतिरिक्त या योजनेतंर्गत निर्वाह भत्ता देण्यात येतो. या निर्वाह भत्त्यातून व्यावसायिक पाठ्यक्रमाची पुस्तके, निवास, भोजन, शालेय साहित्य इत्यादी खर्चाची प्रतिपूर्ती केली जाते. |

| अभ्यासक्रम | हॉस्टेलर (वसतिगृह) | डेस्कॉलर (बहिस्थ) |
|---|---|---|
| चार ते पाच वर्षे | ७०० रुपये प्रतिमहा | १ हजार रुपये प्रतिमहा |
| दोन ते तीन वर्षे | ५०० रुपये प्रतिमहा | ७०० रुपये प्रतिमहा |
| दोन वर्षापेक्षा कमी | ५०० रुपये प्रतिमहा | ५०० रुपये प्रतिमहा |

## ५ अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना

**पात्रतेचे निकष**

विद्यार्थी अनुसूचित जाती किंवा नवबौद्ध घटकातील असावा.
विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ३५ वर्षे व पीएच. डी. साठी ४० वर्षे कमाल वयोमर्यादा असेल.
विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे.
परदेश शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत दोन वर्षे कालावधीचाच एमबीए अभ्यासक्रम अनुज्ञेय राहील.
भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या संकेतस्थळावरील एमडी व एमएस अभ्यासक्रमच प्रवेशासाठी पात्र असतील.
परदेशातील शिक्षण संस्था ही जागतिक क्रमवारीत (QS World University Rank) २०० च्या आत असावी.
पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी पदवी परीक्षेत व पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर परीक्षेत किमान ५५ टक्के गुण असणे आवश्यक.
सदर योजनेचा लाभ एका कुटुंबातील फक्त एका विद्यार्थ्यास एकदाच घेता येईल.

**लाभाचे स्वरुप**

विद्यापीठाने प्रमाणित केलेल्या शिक्षण शुल्काची पूर्ण रक्कम तसेच विद्यार्थ्यांस आवश्यक आरोग्य विमा (Health Insurance) परदेश शिष्यवृत्तीधारकांसाठी अनुज्ञेय असतील.
विद्यार्थ्यास वार्षिक निर्वाह भत्ता अमेरिका व इतर राष्ट्रांसाठी यू. एस. डॉलर १५,४०० तर यू.के.साठी जी.बी.पौंड ९,९०० इतका अदा करण्यात येतो.
विद्यार्थ्यास परदेशात जाताना व अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर परत येताना विमान प्रवासाचा खर्च अनुज्ञेय असेल.

**विद्यार्थ्यांनी चाळीचाळीत जाऊन जनतेचे अज्ञान आणि खुळ्या समजुती दूर केल्या पाहिजेत, तरच आपल्या शिक्षणाचा जनतेला काही तरी लाभ होईल. आपण आपल्या ज्ञानाचा केवळ परीक्षा पास करण्यासाठीच उपयोग करून चालणार नाही. ज्ञानाचा उपयोग आपण आपल्या बांधवांची सुधारणा, प्रगती करण्याकरिता केला पाहिजे; तरच भारत उन्नतावस्थेला जाईल.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर (महाड, २ मे, १९५४)

| | | |
|---|---|---|
| ६ | **राज्यातील अनुसूचित जातीच्या १०० विद्यार्थ्यांना देशातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षणासाठी "राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना"** | |
| | **पात्रतेचे निकष** | विद्यार्थी अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील असावा.<br>विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.<br>कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न ६ लाख रुपयांपेक्षा कमी असावे.<br>विद्यार्थी या योजनेसाठी दिनांक ८ नोव्हेंबर २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासन परिशिष्ट ब अन्वये महाराष्ट्र शासनाने मान्य केलेल्या संस्थेत प्रवेशित असावा. (उदा. IIM, IIT, NIT, IISER, IIIT, IIIM)<br>सदर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थी इयत्ता १० वी आणि १२ वी ची परीक्षा महाराष्ट्र राज्य माध्यमिक बोर्ड/ केंद्रीय बोर्ड (CBSE) यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या माध्यमिक परीक्षांमध्ये किमान ५५ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झालेला असावा. |
| | **लाभाचे स्वरुप** | संस्थेने आकारणी केलेले शैक्षणिक शुल्क, वसतिगृह व भोजन शुल्क.<br>क्रमिक पुस्तकांसाठी ५ हजार रुपये व शैक्षणिक साहित्यासाठी ५ हजार रुपये, असे वर्षाला एकूण १० हजार रुपये. |
| ७ | **शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील पीपीपी योजनेअंतर्गत उपलब्ध जागांवर तसेच खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता “व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती” योजना** | |
| | **पात्रतेचे निकष** | शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील पीपीपी योजनेंतर्गत प्रवेशासाठी उपलब्ध जागांसाठी व खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेला असावा.<br>विद्यार्थ्याने यापूर्वी खासगी व शासकीय औद्योगिक संस्थेमध्ये कोणत्याही अभ्यासक्रमाचा लाभ घेतलेला नसावा. तसेच, केंद्र / राज्य शासनाच्या विभागाने अथवा त्यांच्या अधिपत्याखालील स्थानिक प्राधिकरण, कंपन्या अथवा महामंडळे यांनी पुरस्कृत केलेल्या कोणत्याही प्रशिक्षण कार्यक्रमाचा यापूर्वी लाभ घेतलेला नसावा.<br>कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपये असावे.<br>अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. |
| | **लाभाचे स्वरुप** | विद्यार्थ्यांकरिता विहित केलेल्या प्रशिक्षण शुल्काच्या रक्कमेची १०० टक्के प्रतिपूर्ती अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहील. |

## वरील योजनांसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया

**विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने अर्ज संबंधित महाविद्यालयास सादर करायचा आहे. अधिक माहितीसाठी https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या. अथवा, संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाज कल्याण अधिकारी आणि संबंधित महाविद्यालय यांच्याशी संपर्क साधावा.**

| | | |
|---|---|---|
| ८ | **अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी असलेल्या शासकीय वसतिगृहाचे परिरक्षण** | |
| | **पात्रतेचे निकष** | गुणवत्तेनुसार प्रवेश.<br>विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.<br>प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रुपये २ लाख ५० हजारांपेक्षा जास्त नसावे.<br>इयत्ता ८ वी व त्यापुढे महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी अर्ज करता येईल.<br>अर्ज करावयाची मुदत शालेय विद्यार्थ्यांसाठी जुलैपूर्वी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी जुलै ते ऑगस्टपर्यंत. |
| ९ | **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना** | |
| | **पात्रतेचे निकष** | विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.<br>शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी पात्र असलेल्या अभ्यासक्रमास विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेला असावा.<br>विद्यार्थी अनुसूचित जाती व नवबौद्ध या प्रवर्गाचा असावा.<br>विद्यार्थ्याने जात प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.<br>विद्यार्थ्याने स्वत:चा आधार क्रमांक ज्या राष्ट्रीयकृत/शेड्यूल्ड बँकेत खाते उघडले आहे, त्या खात्याशी संलग्न करणे बंधनकारक असेल.<br>विद्यार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न रु. २.५० लाखांपेक्षा जास्त नसावे तसेच केंद्र शासनामार्फत ज्या-ज्या वेळी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादेत वाढ होईल, त्यानुसार या योजनेसाठी पालकांची उत्पन्न वार्षिक मर्यादा त्या-त्या प्रमाणात लागू राहील.<br>विद्यार्थी स्थानिक नसावा.<br>महानगरपालिकेच्या हद्दीपासून पाच किलोमीटर परिसरात असलेल्या महाविद्यालयात/ शिक्षण संस्थेत शिकत असलेले विद्यार्थीदेखील या योजनेचा लाभ मिळण्यास पात्र असतील.<br>तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम ३८ हजार रुपये प्रतिवर्ष एवढी आहे.<br>विद्यार्थी इयत्ता ११ वी, १२ वी आणि त्यानंतरचे उच्च शिक्षण घेणारा असावा.<br>इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास १० वी मध्ये किमान ५० टक्के गुण असणे अनिवार्य आहे.<br>इयत्ता १२ वी मध्ये विद्यार्थ्यास किमान ५० टक्के गुण असतील तरच या योजनेचा पुढे पदवी/ पदव्युत्तर शिक्षणाकरिता लाभ घेता येईल.<br>पदवी, पदविका, दोन वर्षापेक्षा कमी कालावधी नसणाऱ्या कोणत्याही मान्यताप्राप्त अभ्यासक्रमास विद्यार्थ्याला पुढे लाभ घेण्याकरिता किमान ५० टक्के गुण किंवा त्या प्रमाणात ग्रेडेशन/CGPA असणे आवश्यक आहे.<br>विद्यार्थ्याची निवड गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.<br>या योजनेसाठी खास बाब सवलत लागू राहणार नाही.<br>विद्यार्थी महाराष्ट्र राज्यात कोठेही शिकत असला तरी तो ज्या जिल्ह्यात शिक्षण घेत आहे त्याच जिल्ह्याच्या सहायक आयुक्त कार्यालयाकडे त्याने अर्ज करावा. |



# भावी जीवनाची उभारणी विद्यापीठात होते ह्यासंबंधी विद्यार्थ्यांनी सजग राहिले पाहिजे

मुंबईतील एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये दिनांक १५ डिसेंबर १९५२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण आयोजित करण्यात आले होते. ते आपल्या भाषणात म्हणाले,

"मानवी जीवनातील वैचारिक आणि नैतिक मूल्ये कधीच स्थिर राहिली नाहीत. ती कालमानाप्रमाणे प्रत्यही बदलत राहतात. नुसती बदलतातच नव्हे तर ती प्रगत होत जातात. भारतीय विद्यार्थ्यांनीही या नव्या-नव्या निर्माण होणाऱ्या जीवनमूल्याची दखल घेतली पाहिजे आणि आपणही ती आचरणात आणण्यास सिद्ध राहिले पाहिजे. हे नवे तत्त्वज्ञान आपल्या विद्यादायी संस्था आपल्या शिक्षणक्रमात घालतात की नाही याकडेही पाहिले पाहिजे.

पण खेदाची गोष्ट ही की, आधुनिक विद्यार्थ्यांची बौद्धिक आणि वैचारिक पातळी रोडावत खाली चाललेली आहे. भूतकाळातील मानवी प्रज्ञेशी तुलनाच होऊ शकत नाही. ही बौद्धिक पातळी का खाली घसरली ह्याचा विद्यार्थ्यांनी विचार करणे आवश्यक आहे आणि या परागतीचे कारण अगदी स्पष्ट आहे. आजचा विद्यार्थीवर्ग भूतकालीन प्रज्ञावंत आणि प्रतिभावंत याच्या तत्त्वज्ञान व वाङ्मयकृतींचा अभ्यास मन लावून करीत नाही.

उलटपक्षी, आजचा विद्यार्थीवर्ग फुटबॉल, क्रिकेट आणि पोकळ राजकारणात दंग असतो. विद्यार्जन याला एक मोठा अर्थ असतो. आपली प्राचीन गुरुकुले एकांतात विद्या शिकवीत असत. रानावनातून ही विद्यापीठे प्रस्थापित झाली होती त्याचे मुख्य कारण असे की, त्यांना विद्येच्या अभ्यासाने नवी दृष्टी यावी. या दृष्टीतून त्यांनी खऱ्या जीवनमूल्यांचा शोध व बोध घ्यावा. पण आजचे विद्यार्थी क्रीडेच्या आणि राजकारणाच्या फंदात ती दिव्यदृष्टी प्राप्त करून घेतच नाहीत.

हिंदी विद्यालयातील शिक्षक मोठ्या कष्टाने, केवळ अंगीकारले आहे म्हणून विद्यादान करीत असतो. स्वयंप्रेरणेने हे विद्यादान होत नाही. शिक्षकाला लागणारी अंतःस्फूर्ती, विद्यादानाची हौस आणि त्यासाठी करावा लागणारा अव्याहत व्यासंग या सर्वांचीच त्यांच्याकडे वानवा असते. किंबहुना अध्यापक पेशाला जे नोकरीचे हिडीस स्वरूप आले आहे आणि तास भरून काढण्यासाठीच त्याला शिकवावे लागत असल्यामुळेच अध्यापक वर्गामध्ये हे शैथिल्य निर्माण झाले असावेत व त्यामुळे अध्यापकहीं विद्यार्थ्यांना विचारप्रवर्तक ज्ञान पाजण्यास असमर्थ झाले आहेत.

विद्यालयांनी आपल्या फी भरमसाठ वाढविल्या आहेत. या फी अशाच वाढू लागल्या तर विद्यार्थ्यांच्या भावी जीवनावर याचा निश्चितपणे अनिष्ट परिणाम होईल. त्यांचे भवितव्य भयाण होईल. केबन म्हणतो, 'Knowledge is Power' ' ज्ञान ही महान शक्ती आहे.' विद्यार्थी वर्गाला जर या ज्ञानाची कास धरून आपल्या देशाचा विकास आणि उद्धार करून घ्यायचा असेल तर त्यांनी विद्यापीठाच्या कारभारात जरूर लक्ष घालून आपल्या हक्कासाठी सतत झगडत राहिले पाहिजे."

(संदर्भ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे. खंड १८, भाग ३)



# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्राला दिलेला दिव्य संदेश आणि इशारा

"आपण केवळ राजकीय लोकशाहीवर संतुष्ट राहू नये. आपल्या राजकीय लोकशाहीचे आपण सामाजिक लोकशाहीत परावर्तन करायलाच हवे. राजकीय लोकशाहीचा पाया जर सामाजिक लोकशाहीवर आधारित नसेल तर ती टिकूच शकणार नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे एक जीवनाचा मार्ग आहे, जो स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव यांना जीवनाची तत्त्वे म्हणून मान्यता देतो...

२६ जानेवारी १९५० रोजी आपण एका विसंगतीयुक्त जीवनात प्रवेश करणार आहोत. राजकीय जीवनात आपल्याला समता असेल; परंतु सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता राहील. राजकारणात प्रत्येकाला एक व्यक्ती, एक मत आणि एक मत, एक मूल्य हे तत्त्व आपण मान्य करणार आहोत आणि आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मात्र, आपल्या सामाजिक संरचनेच्या कारणाने 'एक व्यक्ती एक मूल्य' हे तत्त्व नाकारणे पुढेही चालू ठेवणार आहोत. अशा परस्परविरोधी जीवनात राहाणे आपण कुठपर्यंत चालू ठेवणार आहोत? आपल्या सामाजिक व आर्थिक जीवनात आणखी किती काळ समता नाकारणार आहोत आणि जर ती आपण यापुढे अधिक काळ नाकारत राहिलो, तर आपली राजकीय लोकशाही धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. ही विसंगती आपण शक्य असेल तितक्या लवकरातल्या लवकरच्या क्षणी दूर केली पाहिजे. अन्यथा ज्यांना या विषमतेचे परिणाम भोगावे लागत आहेत ते या संविधान सभेने इतक्या परिश्रमाने उभी केलेली ही राजकीय लोकशाहीची संरचना उद्ध्वस्त केल्याशिवाय राहाणार नाहीत."

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

(घटना समितीत २५ नोव्हेंबर १९४९ रोजी केलेल्या भाषणातून)



२६ जानेवारी १९५० पासून भारताच्या राज्यघटनेचा अंमल सुरु झाला. प्रजासत्ताक भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणून बाबासाहेबांना राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी शपथ दिली. शेजारी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु (८ मे १९५०)

| | | |
|---|---|---|
| १० | **इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना** | |
| | **पात्रतेचे निकष** | सदर योजना शासकीय मान्यताप्राप्त शाळेत शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांस लागू असेल.<br>विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न २. ५० लाख रुपयांच्या आत असावे.<br>विद्यार्थ्यांना किमान गुणांची अट नाही. |
| | **लाभाचे स्वरुप** | योजनेचा लाभ केंद्राच्या इतर माध्यमिक पूर्व शिष्यवृत्तीच्या लाभार्थ्यांना लागू राहणार नाही. राज्य शासनाची सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती ही योजना अनुसूचित जाती प्रवर्गातील इयत्ता ८ वी ते १० वी च्या सर्व मुलींसाठी सुरू आहे. यामध्ये पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा नाही. परंतु, इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेमध्ये रुपये २.५० लाख इतके वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलींचा समावेश होणार आहे. त्यामुळे, अनुसूचित जाती प्रवर्गातील इयत्ता ८ वी च्या मुली आणि २ लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या इयत्ता ९ वी व १० वी च्या मुलींकरिता सध्याची सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना यापुढेही चालू राहील. परंतु, एकाच लाभार्थ्यांस दोन्ही योजनेचा लाभ घेता येणार नाही. |
| ११ | **साफसफाई व आरोग्यास धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना** | |
| | **पात्रतेचे निकष** | अस्वच्छ व्यवसायात काम करणारे, अस्वच्छ व्यवसायाशी परंपरेने संबंधित सफाई कर्मचारी, कातडी सोलणे, कातडी कमावणे हा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींच्या पाल्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते.<br>ही शिष्यवृत्ती सर्व जाती-धर्माला लागू आहे. उत्पन्नाची अट नाही.<br>अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना ग्रामसेवक व सरपंच, नगरपालिका मुख्याधिकारी, महानगरपालिका आयुक्त/उपायुक्त/प्रभाग अधिकारी यांचेकडून अस्वच्छ व्यवसाय करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>अनुसूचित जातीमध्ये समावेश असलेल्या पालकांच्या पाल्यांसाठी जातीचा दाखला आवश्यक आहे. |
| | **लाभाचे स्वरुप** | वसतिगृहात न राहणाऱ्या इयत्ता पहिली ते इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांना दरमहा ३५० रुपये<br>वसतिगृहात न राहणाऱ्या इयत्ता तिसरी ते इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना दरमहा ३५० रुपये<br>वसतिगृहात राहणाऱ्या इयत्ता तिसरी ते इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना दरमहा ८०० रुपये |
| १२ | **सैनिकी शाळेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता** | |
| | **पात्रतेचे निकष** | विद्यार्थी ५ वी ते १० वी पर्यंतच्या वर्गात शिकत असलेला असावा.<br>विद्यार्थी मागासवर्गीय अथवा अनुसूचित जाती या प्रवर्गातील असावा.<br>पालकाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. |
| | **लाभाचे स्वरुप** | नाशिक, पुणे, सातारा, चंद्रपूर येथील सैनिकी शाळांमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क, भोजन, निवास, कपडे, घोडेस्वारी, किरकोळ खर्च इत्यादीवर होणाऱ्या संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येते. इतर मान्यताप्राप्त सैनिकी शाळांना प्रति विद्यार्थी प्रतिवर्षी १५ हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते. |

| | | |
|---|---|---|
| १३ | **सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना** | |
| | **पात्रतेचे निकष** | उत्पन्न व गुणांची अट नाही, विद्यार्थी अनुसूचित जाती या प्रवर्गातील असावा |
| | **लाभाचे स्वरुप** | इयत्ता ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी दरमहा ६० रुपये (१० महिन्यांसाठी ६०० रुपये) व इयत्ता ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना दरमहा १०० रुपये (१० महिन्यासाठी १ हजार रुपये) |
| १४ | **माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती** | |
| | **पात्रतेचे निकष** | मान्यताप्राप्त प्राथमिक / माध्यमिक शाळेतील इयत्ता ५ वी ते १० वी च्या वर्गामध्ये शिकणारा विद्यार्थी मागासवर्गीय असावा.<br>मागील वार्षिक परीक्षेत कमीत-कमी ५० टक्के व त्याहून अधिक गुण मिळवून मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधून प्रथम व द्वितीय क्रमांकात उत्तीर्ण झालेल्या गुणवत्ता प्रदान मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात येईल.<br>उत्पन्नाची अट नाही. |
| | **लाभाचे स्वरुप** | इयत्ता ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना दरमहा ५० रुपये ( १० महिन्यासाठी ५०० रुपये) आणि इयत्ता ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना दरमहा १०० रुपये ( १० महिन्यासाठी १ हजार रुपये) |
| १५ | **महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मॅट्रिकपूर्व शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क योजना** | |
| | **पात्रतेचे निकष** | अनुसूचित जाती प्रवर्गातील इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी मध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती.<br>विद्यार्थ्यांचे पालक महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असतील अशा विद्यार्थ्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता सर्व स्तरावरील मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती.<br>खासगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांमध्ये इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती. |
| | **लाभाचे स्वरुप** | अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची इयत्ता निहाय प्रतिपूर्ती.<br>विद्यार्थ्यांना द्यावयाच्या दरमहा शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती (वर्षातून दहा महिने कालावधीसाठी)<br>पहिली ते चौथी - १०० रुपये दरमहा<br>पाचवी ते सातवी - १५० रुपये दरमहा<br>आठवी ते दहावी - २०० रुपये दरमहा |

## या सर्व योजनांसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया

**संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी https://prematric.mahait.org या संकेतस्थळावरून संबंधित विद्यार्थ्यांचा ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरून तो तालुक्याच्या गटशिक्षण अधिकारी यांचेकडे ऑनलाईन पद्धतीने सादर करायचा आहे. अधिक माहितीसाठी संबधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी अथवा जिल्हा परिषदेला भेट द्यावी .**

| | | |
|---|---|---|
| १६ | **स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी अनुदानित आश्रमशाळांना सहायक अनुदान** | |
| | **पात्रतेचे निकष** | शाळा व शाळांनी चालविलेले अभ्यासक्रम मान्यताप्राप्त असावेत.<br>ज्या जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या महिलांचे साक्षरतेचे प्रमाण ३० टक्क्यांपेक्षा कमी आहे (सन २००१ च्या जनगणनेनुसार) अशा जिल्ह्यांमध्ये सदरच्या शाळा विचारार्थ घेण्यात याव्यात.<br>एकाच जिल्ह्यात दोन किंवा जास्त शाळा/प्रकल्प मंजूर करण्यात येणार नाहीत.<br>प्रकल्प/शाळांना राज्य शासनाची मान्यता आवश्यक राहील.<br>स्वयंसेवी संस्थांची आर्थिक क्षमता विचारात घेण्यात यावी. |
| | **लाभाचे स्वरुप** | कर्मचारी वेतन :- शालेय व वसतिगृह कर्मचारी यांना शंभर टक्के अनुदान.<br>परिपोषण अनुदान :- प्राथमिक आश्रमशाळेतील निवासी विद्यार्थ्यांवर १० महिन्यांकरिता स्वयंसेवी संस्थांना परिपोषण अनुदान रुपये २२०० प्रति विद्यार्थी देण्यात येते.<br>इमारत भाडे :- इमारत भाड्यापोटी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणित केलेल्या भाड्याच्या ७५ टक्के भाडे संस्थेस देण्यात येते.<br>आकस्मिक अनुदान :- शिक्षक व अधीक्षकाच्या एकूण वेतनाच्या १५ टक्के रक्कम आकस्मिक खर्च म्हणून देण्यात येते.<br>सोयी सुविधा :-अनुसूचित जाती आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सोयी सुविधेअंतर्गत वह्या, पुस्तके, स्टेशनरी, गणवेश, अंथरुण, पांघरुण, साबण, तेल इत्यादी वस्तू पुरविण्यात येतात. |
| | **अर्ज कुठे सादर करायचा?** | जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाज कल्याण |
| | **संपर्क कार्यालय** | संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त, /संबंधित अनुसूचित जाती आश्रमशाळेचे मुख्याध्यापक व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद |

| | | |
|---|---|---|
| १७ | **प्रधानमंत्री- अनुसूचित जाती अभ्युदय योजना (PM-AJAY) ( पूर्वीचे नांव - बाबू जगजीवनराम छात्रावास योजना)** | |
| | **पात्रतेचे निकष** | कार्यरत संस्था सामाजिक न्याय विभाग अंतर्गत अथवा केंद्रीय विद्यापीठ अंतर्गत विद्यापीठ यापैकी असावी. संस्थेने बांधकाम अनुदानासाठी स्वतंत्ररित्या अर्ज केला असावा.<br>संस्थेने बांधकामाचे निश्चित स्वरुपाचे वेळापत्रक सादर करून केंद्रीय अनुदान मिळाल्यापासून ५ वर्षाच्या आत बांधकाम करणे आवश्यक आहे.<br>संस्थेमध्ये १०० प्रवेशितांपेक्षा जास्त प्रवेशितांसाठी अनुदान मिळणार नाही.<br>१०० विद्यार्थ्यांपैकी १० टक्के बिगर अनुसूचित जातीचे विद्यार्थी असणे आवश्यक . |
| | **लाभाचे स्वरुप** | मुलांच्या वसतिगृहासाठी ५० टक्के केंद्र शासन तर ५० टक्के राज्य शासन<br>मुलींच्या वसतिगृहासाठी १०० टक्के ( केंद्र शासन : स्वयंसेवी संस्था) |
| | **अर्ज कुठे सादर करायचा?** | जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाज कल्याण |
| | **संपर्क कार्यालय** | जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाज कल्याण |



“ मनुष्याच्या अंगी जितके नैतिक बळ अधिक असेल तितका त्याचा आत्मविश्वास वाढत जाऊन पराजयातूनही त्याला शेवटी सन्मानाचे यश मिळविता येते. ”

| | | |
|---|---|---|
| १८ | **राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार** | |
| | **पात्रतेचे निकष** | सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रत्येक बोर्डामधून प्रथम आलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गाचा विद्यार्थी.<br>सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रत्येक विभागीय बोर्डाच्या गुणवत्ता यादीमध्ये आलेला प्रत्येक अनुसूचित जातीचा विद्यार्थी.<br>सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून जिल्ह्यात प्रथम आलेला अनुसूचित जातीचा विद्यार्थी.<br>सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून तालुक्यात प्रथम आलेला अनुसूचित जातीचा विद्यार्थी.<br>सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रत्येक माध्यमिक विद्यालयात व कनिष्ठ महाविद्यालयामधून इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत प्रथम आलेला अनुसूचित जातीचा विद्यार्थी. |
| | **लाभाचे स्वरुप** | सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रत्येक बोर्डामधून प्रथम आलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यास १ लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र.<br>सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रत्येक विभागीय बोर्डाच्या गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या प्रत्येक अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यास ५० हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र.<br>सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून जिल्ह्यात प्रथम आलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यास २५ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र.<br>सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून तालुक्यात प्रथम आलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यास १० हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र.<br>सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रत्येक माध्यमिक विद्यालयात व कनिष्ठ महाविद्यालयामधून इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत प्रथम आलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यास ५ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र. |
| | **अर्ज कुठे सादर करायचा?** | विद्यार्थ्यांना संबंधित समाज कल्याण कार्यालयातून अर्ज मिळतील |
| | **संपर्क कार्यालय** | संबधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाज कल्याण |
| १९ | **औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांना विद्यावेतन** | |
| | **पात्रतेचे निकष** | विद्यार्थी अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील असावा.<br>विद्यार्थी मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिकणारा असावा. |
| | **लाभाचे स्वरुप** | संस्थेच्या वसतिगृहात राहणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण विभागाकडून दरमहा ६० रुपये विद्यावेतन देण्यात येते, त्या विद्यार्थ्यांना समाज कल्याण विभागाकडून दरमहा ४० रुपये पूरक विद्यावेतन देण्यात येते.<br>तंत्रशिक्षण विभागाकडून ज्यांना विद्यावेतन देण्यात येत नाही, त्यांना समाज कल्याण विभागाकडून दरमहा १०० रुपये विद्यावेतन देण्यात येते.<br>पालकाचे वार्षिक उत्पन्न ६५ हजार २९० रुपयांपेक्षा जास्त नसावे. |
| | **अर्ज कुठे सादर करायचा?** | संबंधित प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, संबंधित जिल्ह्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी |
| | **संपर्क कार्यालय** | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद |



# शीलाशिवाय शिक्षणाची किंमत केवळ शून्य

रावळी कॅम्प महिला मंडळाच्या विनंतीला मान देऊन, दि. ३ जून १९५३ रोजी सायंकाळी ७ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सौ. माईसाहेब आंबेडकर यांचेसह रावळी कॅम्पला भेट दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर याप्रसंगी केलेल्या भाषणात म्हणाले,

"आपण धर्मासाठी सत्याग्रह केला. धर्मांतराचा ठराव केला. सर्वकाही केले, आता आपण आपले मन पवित्र केले पाहिजे, आपला सद्‌गुणांकडे ओढा असला पाहिजे. अशारितीने आपण धार्मिक बनावयास पाहिजे. आपण शिकलो म्हणजे सर्वकाही झाले असे नाही. शिक्षणाचे महत्त्व आहे यात शंका नाही. मात्र शिक्षणाबरोबरच माणसाचे शीलही सुधारले पाहिजे. शीलाशिवाय शिक्षणाची किंमत केवळ शून्य आहे. ज्ञान हे तलवारीसारखे आहे. समजा एखाद्या माणसाच्या हाती तलवार आहे. तिचा सदुपयोग की दुरूपयोग करावयाचा हे त्या माणसाच्या शीलावर अवलंबून राहील. तो त्या तलवारीने एखाद्याचा खूनही करील, किंवा एखाद्याचा बचावही करील ज्ञानाचेही तसेच आहे. एखादा शिकलेला माणूस त्याचे शील चांगले असेल तर आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकांच्या कल्याणासाठी करील. परंतु त्याचे शील चांगले नसेल तर तो आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकांचे अकल्याण करण्याकडेही खर्च करील, शील हे धर्माचे मोठे अंग आहे. शिकलेली माणसे नुसती पोटभरू असून भागणार नाही. ज्यांना स्वार्थापलीकडे काही दिसत नाही: ज्यांना थोडाही परार्थ करता येत नाही ती माणसे नुसती शिकली म्हणून काय झाले? त्यांचा दुसऱ्याला उपयोग तो काय? "तव्याचा जाय बुरसा मग तो सहजच होय आरसा," शिक्षणाचा उपयोग असा झाला पाहिजे."

(संदर्भ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे. खंड १८, भाग ३)



अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत महाविद्यालयीन शिक्षण जेथे घेतले होते, त्या मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाला १६ डिसेंबर १९५२ रोजी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित राहिले.



अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाने (न्यूयॉर्क) ५ जून १९५२ रोजी विद्यापीठाच्या ९८ व्या पदवीदान समारंभात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना एलएल. डी. (डॉक्टर ऑफ लॉज) या पदवीने सन्मानित केले. प्रस्तुत छायाचित्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर (डावीकडे) मंचाशेजारी इतर दोघा सन्मानमूर्तींसह पुढच्या रांगेत बसलेले आहेत.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रयत्नांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या दोन तुकड्या शिक्षणासाठी इंग्लंडला गेल्या होत्या. सन १९४६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर लंडनला गेले असता एका तुकडीतील विद्यार्थ्यांनी त्यांची भेट घेतली. (बसलेले डावीकडून) कलोटा, रणदेवसिंग चौधरी रे, पी. के. कयाळ, एम. ए. कांबळे, एस. व्ही. गायकवाड व एम. आर. बोबडे. (उभे) एन. जी. उके, एम. एन. (म.ना.) वानखेडे, डी. एस. जेजुरीकर, टी. बी. आवळे, एल. आर. बेहरा, वाय. सी. गायकवाड, श्रीधर मल्हारी डिखळे, ए. आर. कयाळ, व्ही. बी. कदम, बी. डी. खोब्रागडे

| | | |
|---|---|---|
| २० | **अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी मागासवर्गीय शैक्षणिक संस्थावरील सोयी-सुविधा वाढविणे** | |
| | **पात्रतेचे निकष** | लाभार्थी हा शासकीय वसतिगृहात किंवा शासकीय निवासी शाळेत प्रवेशित असावा. |
| | **लाभाचे स्वरुप** | मोफत निवास व भोजन, अंथरूण-पांघरूण, ग्रंथालयीन सुविधा, प्रत्येक वसतिगृहात आर. ओ. व वॉटरकूलर, गरम पाण्याची सुविधा.<br>दहा विद्यार्थ्यांमागे एक संगणक, प्रिंटर व इंटरनेट सुविधेसह, वसतिगृहात अग्नी प्रतिबंधक प्रणाली, पेस्ट कंट्रोलची सुविधा.<br>शालेय विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी दोन गणवेश, वसतिगृहातील विद्यार्थ्यांना नाईट ड्रेस.<br>क्रमिक पाठ्य पुस्तके, वह्या, स्टेशनरी इत्यादी ग्रंथालयीन पुस्तके.<br>वैद्यकीय आणि अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमानुसार स्टेथोस्कोप, ॲप्रन, ड्रॉईंग बोर्ड, बॉयलर सूट व कला निकेतनच्या विद्यार्थ्यांसाठी रंग, ड्रॉईंग बोर्ड, ब्रश, कॅनव्हास इत्यादी.<br>मुलींना स्वच्छता प्रसाधनासाठी दरमहा अतिरिक्त १०० रुपये.<br>वसतिगृहातील विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन खर्चासाठी निर्वाह भत्ता खालीलप्रमाणे-<br>विभागीय पातळीवर १५०० रुपये, जिल्हा पातळीवर १३०० रुपये,<br>तालुका पातळीवर १००० रुपये. |
| | **संपर्क कार्यालय** | समाज कल्याण आयुक्तालय, पुणे |
| २१ | **अनुसूचित जाती व नवबौद्ध मुला मुलींकरीता तालुका स्तरावर शासकीय निवासी शाळा सुरू करणे** | |
| | **पात्रतेचे निकष** | अनुसूचित जाती व नवबौद्ध घटक – ८० टक्के<br>अनुसूचित जमाती – १० टक्के<br>विमुक्त जाती व भटक्या जमाती – ५ टक्के<br>दिव्यांग प्रवर्ग – ३ टक्के<br>विशेष मागास प्रवर्ग – २ टक्के<br>विद्यार्थी वरील प्रवर्गातील असावा.<br>विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.<br>प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न २ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. |
| | **लाभाचे स्वरुप** | निवासी शाळेत मोफत भोजन, निवास, ग्रंथालयीन सुविधा व इतर आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. |
| | **अर्ज कुठे सादर करायचा?** | ऑफलाईन पद्धतीने विहित नमुन्यातील अर्ज संबंधित निवासी शाळेच्या मुख्याध्यापकांकडे भरुन द्यावेत. |
| | **संपर्क कार्यालय** | संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाज कल्याण |

**या जगामध्ये स्वाभिमानाने जगायला शिका. या जगात आपण काहीतरी करून दाखवायचेच अशी महत्त्वाकांक्षा सदैव तुमच्याकडे असली पाहिजे. लक्षात ठेवा, जे झगडतात तेच पुढे येतात.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर (मुंबई, फेब्रुवारी, १९३३)

| | | |
|---|---|---|
| २२ | **स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहांना सहायक अनुदान** | |
| | **पात्रतेचे निकष** | अनुदानित वसतिगृहांमध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांबरोबरच मांग, वाल्मिकी, कातकारी व माडिया गोंड या प्रवर्गातील स्थानिक विद्यार्थ्यांना आणि अनाथ, दिव्यांग व निराश्रित विद्यार्थ्यांना प्राधान्याने विहित टक्केवारीच्या अधीन राहून प्रवेश देण्यात येतो. |
| | **लाभाचे स्वरुप** | कर्मचारी वेतन :-<br>वसतिगृह अधीक्षक, स्वयंपाकी, मदतनीस व चौकीदार यांना एकत्रित मानधन देण्यात येते.<br>परिपोषण अनुदान :- प्रतिविद्यार्थी प्रतिमाह रुपये २२०० प्रमाणे १० महिन्यांकरिता.<br>इमारत भाडे :- सार्वजनिक बांधकामाने प्रमाणित केल्याच्या ७५ टक्के भाडे संस्थेस देण्यात येते. सोयी सुविधा:- निवास, भोजन, अंथरुण, पांघरुण, क्रीडा साहित्य इत्यादी. |
| | **अर्ज कुठे सादर करायचा?** | संबंधित अनुदानित वसतिगृहाचे अधीक्षक यांचेकडे |
| | **संपर्क कार्यालय** | संबंधित अनुदानित वसतिगृहाचे अधीक्षक व संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद |
| २३ | **सफाई कामगारांच्या मुला-मुलींसाठी निवासी शाळा सुरु करणे** | |
| | **पात्रतेचे निकष** | सदर लाभार्थ्यांचे पालक हे मेहतर / वाल्मिकी समाजातील सफाई व्यवसायामध्ये काम करणारे असावे. |
| | **लाभाचे स्वरुप** | या योजने अंतर्गत निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाबरोबरच राहण्याची व जेवणाची व्यवस्था तसेच गणवेश, अंथरुण-पांघरूण तसेच लेखन सामुग्री इत्यादींचा लाभ दिला जातो. |
| | **अर्ज कुठे सादर करायचा?** | सदर निवासी शाळेमध्ये प्रवेशासाठी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांचेकडे अर्ज करावा |
| | **संपर्क कार्यालय** | सफाई कामगारांच्या मुलां-मुलींसाठी निवासी शाळा, पुणे आणि नागपूर. |

## माझ्यावरील प्रचंड जबाबदारी

काही लोक असे म्हणतात, तुम्ही धर्मांतर करण्यास इतका अवधी का लावला? इतके दिवस काय करीत होता? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. धर्म पटवून देणे हे काम सोपे नाही. ते एका माणसाचे काम नाही. धर्माबाबत विचार करणाऱ्या कोणत्याही माणसास हे समजून येईल. माझ्यावर जेवढी जबाबदारी आहे तेवढी जबाबदारी जगातील कोणत्याही माणसावर नाही. मला अधिक आयुष्य लाभल्यास मी योजलेले कार्य पूर्ण करीन.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
नागपूर येथे १५ ऑक्टोबर १९५६ रोजी केलेल्या भाषणातून.
(प्रबुद्ध भारत, डॉ. आंबेडकर बौद्ध दीक्षा विशेषांक, २७ ऑक्टोबर १९५६)



भारतीय घटना समितीच्या सन्माननीय सदस्यांसमवेत घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल, घटना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मान्यवर.



भारतीय घटना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समवेत मसुदा समितीचे सदस्य व कार्यालयीन अधिकारी (ऑगस्ट १९४७).



घटना समितीची बैठक व चर्चा सुरू असताना मान्यवर सभासदांसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

"नवीन हक्क, मोठ्या नोकऱ्या वगैरे मिळवायच्या, तर त्याला स्वतःची लायकी लागत असते. ती लायकी वाढविण्याचे मुख्य काम विद्यार्थी दशेत तुम्ही करीत असताना तुम्ही इतर कोणत्याही चळवळीत पडणे चुकीचे होईल."

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या (BARTI) योजना

| | | |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | **संशोधन शिष्यवृत्ती** |
| | | विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) आणि परदेशी विद्यापीठांच्या अंतर्गत मान्यताप्राप्त भारतीय विद्यापीठे/ संस्था/ महाविद्यालयांमधून नियमित आणि पूर्णवेळ पीएच. डी. व एम. फिल. करणाऱ्या अनुसूचित जाती या प्रवर्गातील महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना संशोधनासाठी अधिछात्रवृत्तीचा लाभ देण्यात येतो. |
| | पात्रतेचे निकष | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक तत्वांचे पालन करून लाभ देण्यात येतो.<br>लाभार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांच्या आत असावे.<br>अधिछात्रवृत्तीकरिता महिला ३० टक्के, दिव्यांग ५ टक्के आणि अनाथांसाठी १ टक्के आरक्षण आहे. |
| | लाभाचे स्वरुप | राज्य विद्यापीठांमार्फत भारतीय विद्यापीठ अनुदान आयोग (UGC), राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त आणि विकास महामंडळ (NSFDC) व इतर तत्सम संस्थांमार्फत देखील विद्यावेतन देण्यात येते. त्यामुळे सदर योजनेअंतर्गत लाभ घेण्यात येत असलेल्या विद्यार्थ्यांचा समावेश अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत करण्यात येणार नाही. अथवा, त्यांना वरीलपैकी एकच पर्याय उपलब्ध करून दिला जाईल. |
| | विद्यापीठ प्रवेश | योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्याकरिता विद्यार्थ्यांनी किमान 'बी प्लस' मानांकन प्राप्त शासकीय विद्यापीठात तसेच 'ए' मानांकन प्राप्त खासगी विद्यापीठात प्रवेश घेणे आवश्यक आहे. |
| २ | योजनेचे नाव | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण** |
| | | महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा, अभियांत्रिकी सेवा, न्यायिक सेवा, गट ब व क परीक्षा पूर्व प्रशिक्षण.<br>यूपीएससी, एमपीएससी, पोलीस व मिलिटरी, बँक, रेल्वे, एलआयसी इत्यादी तत्सम पदाच्या परीक्षेकरीता पात्र उमेदवारांना मोफत प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षणाचा समावेश आहे. |
| | अर्ज कसा करावा? | सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन स्वरूपात अर्ज मागविण्यात येतात. प्राप्त अर्जांची छाननी करून विद्यार्थ्यांची चाळणी परीक्षा घेण्यात येते. त्यानंतर गुणवत्ता व आरक्षणनिहाय विद्यार्थ्यांची निवड करून प्रशिक्षण देण्यात येते. |
| | आरक्षण | महिलांसाठी ३० टक्के<br>दिव्यांगांकरिता ५ टक्के<br>अनुसूचित जाती अंतर्गत वंचित जातीमधील मांग, मातंग, होलार, वाल्मिकी, मादगी व इतर प्रवर्गांसाठी ५ टक्के.<br>अनाथांकरिता १ टक्के. |



"कोणत्याही समाजाची उन्नती त्या समाजातल्या शिक्षणाच्या प्रगतीवर अवलंबून असते."

| | | |
|---|---|---|
| | **पात्रतेचे निकष** | विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.<br>उमेदवाराकडे महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा दाखला व अधिवास असावा.<br>समांतर योजनेचा लाभ न घेतल्याचे हमीपत्र आवश्यक.<br>उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>उमेदवाराचे वय महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवेच्या अटी व शर्तीनुसार असावे.<br>निवड झालेल्यांपैकी पात्र विद्यार्थ्यांना प्रशिक्षणादरम्यान रोज ४ तास व त्यापेक्षा जास्त कालावधीचे प्रशिक्षण देण्यात येईल. तसेच एकूण दरमहा ८० टक्क्यांपेक्षा जास्त कालावधी प्रशिक्षणास उपस्थित राहणे अनिवार्य राहील.<br>प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणतीही शासकीय/निमशासकीय/खासगी नोकरी व व्यवसाय करता येणार नाही.<br>वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांच्या आत असावे. |
| ३ | **योजनेचे नाव** | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण** |
| | **कालावधी** | ११ महिने |
| | **लाभाचे स्वरुप** | विद्यावेतन १० हजार रुपये प्रति महिना, प्रति विद्यार्थी<br>आनुषंगिक लाभ १२ हजार रुपये प्रति विद्यार्थी (एकवेळ) |
| ४ | **योजनेचे नाव** | **एमपीएससी अराजपत्रित गट ब व गट क सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण** |
| | **कालावधी** | ६ महिने |
| | **लाभाचे स्वरुप** | विद्यावेतन १० हजार रुपये प्रति महिना, प्रति विद्यार्थी<br>आनुषंगिक लाभ १२ हजार रुपये, प्रति विद्यार्थी (एकवेळ) |
| ५ | **योजनेचे नाव** | **एमपीएससी महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (MES) परीक्षा पूर्व प्रशिक्षण** |
| | **कालावधी** | ११ महिने |
| | **लाभाचे स्वरुप** | विद्यावेतन १० हजार रुपये प्रति महिना, प्रति विद्यार्थी<br>आनुषंगिक लाभ १२ हजार रुपये प्रति विद्यार्थी (एकवेळ) |
| ६ | **योजनेचे नाव** | **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग (JMFC) प्रशिक्षण** |
| | **कालावधी** | ११ महिने |
| | **लाभाचे स्वरुप** | विद्यावेतन १० हजार रुपये प्रति महिना, प्रति विद्यार्थी<br>आनुषंगिक लाभ १२ हजार रुपये प्रति विद्यार्थी (एकवेळ) |
| ७ | **योजनेचे नाव** | **केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) नागरी सेवा पूर्व तथा मुख्य परीक्षेचे पूर्वतयारी** |
| | | उमेदवार महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीचा असावा व महाराष्ट्राचा अधिवास असावा.<br>कोणत्याही विषयात पदवीधारक असावा.<br>वय २१ ते ३७ वर्षे.<br>केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) परीक्षेच्या निकषांप्रमाणे पात्र असावा. |

| | | |
|---|---|---|
| ८ | **योजनेचे नाव** | **बँकिंग, रेल्वे, एलआयसी आणि लिपिकवर्गीय तत्सम पदाच्या पूर्व-स्पर्धा परीक्षा (आयबीपीएस)** |
| | | महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील युवकांना स्पर्धात्मक परीक्षांना सामोरे जाण्यास सक्षम करण्यासाठी बँकिंग, रेल्वे, एलआयसी आणि लिपिकवर्गीय तत्सम पदाच्या पूर्व-स्पर्धा परीक्षा (IBPS) प्रकल्प सुरू करण्यात आला आहे.<br>प्रशिक्षणासंबंधीची जाहिरात https://www.barti.in/notice-board वर आणि स्थानिक वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध केली जाते. ऑनलाइन/ऑफलाइन अर्ज प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर १०० गुणांची सीईटी परीक्षा संबंधित जिल्ह्यात आयोजित केली जाते, जिथे प्रशिक्षण कार्यक्रम नियोजित आहे.<br>परीक्षेला बसलेल्या उमेदवारांपैकी १५० विद्यार्थ्यांची निवड गुणवत्तेच्या आधारे ६ महिन्यांच्या कालावधीच्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी केली जाते. |
| | **पात्रतेचे निकष** | अर्जदार अनुसूचित जाती प्रवर्गाचा असावा. अर्जदाराचे वय १८ ते ३४ असावे.<br>अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असावा. अर्जदार किमान १२ वी उत्तीर्ण असावा.<br>वार्षिक उत्पन्न रुपये ८ लाखांच्या आत असावे. |
| | **लाभाचे स्वरुप** | ६ महिन्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या कालावधीसाठी पात्र विद्यार्थ्यांच्या खात्यात दरमहा ६ हजार रुपये जमा केले जातात.<br>पुस्तक संच व इतर शैक्षणिक साहित्यासाठी थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे विद्यार्थ्यांच्या खात्यात ५ हजार रुपये जमा केले जातात. |
| ९ | **योजनेचे नाव** | **कौशल्य विकास विभाग** |
| | | अनुसूचित जातीतील बेरोजगार युवक-युवतींना रोजगारासाठी प्रशिक्षण दिले जाते. तसेच उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी उद्योजकता विकास प्रशिक्षण दिले जात आहे. नामांकित प्रशिक्षण संस्थांकडून विविध तांत्रिक तसेच अतांत्रिक अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते. |
| | **लाभाचे स्वरुप** | रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण.<br>कॅपिटेटिव्ह मनुष्यबळासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण.<br>औद्योगिक क्लस्टरद्वारे कौशल्य विकास प्रशिक्षण.<br>शासकीय प्रशिक्षण संस्थांद्वारे कौशल्य विकास प्रशिक्षण.<br>कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अंतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षण.<br>ऑफलाईन प्रशिक्षण कार्यक्रम. ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रम.<br>निवासी प्रशिक्षण कार्यक्रम. अनिवासी प्रशिक्षण कार्यक्रम.<br>सॉफ्ट स्किल प्रशिक्षण कार्यक्रम. जिल्हास्तरीय मेळावे. |
| | **पात्रतेचे निकष** | उमेदवार १८ ते ४५ वयोगटातील असावा.<br>उमेदवार अनुसूचित जातीचा असावा.<br>उमेदवाराकडे अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र असावे.<br>उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असावा.<br>उमेदवाराकडे कौशल्य विकास प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे.<br>उमेदवाराची कोणत्याही ठिकाणी रोजगार करण्याची इच्छा असावी. |

| | | |
|---|---|---|
| १० | योजनेचे नाव | **दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थेमध्ये यूपीएससी नागरी सेवा परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण** |
| | पात्रतेचे निकष | उमेदवाराची निवड प्रवेश परीक्षेत मिळालेल्या गुणवत्तेच्या आधारावर केली जाते. |
| | लाभाचे स्वरुप | १२ हजार रुपये विद्यावेतन प्रति उमेदवार, प्रति महिना<br>मोफत प्रशिक्षण. प्रवास भत्ता – १० हजार रुपये (एकदा)<br>संस्था पेमेंट अंदाजे १८ लाख रुपये (एकदा) |
| ११ | योजनेचे नाव | **महाराष्ट्रातील प्रशिक्षण संस्थेत यूपीएससी नागरी सेवा परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण** |
| | लाभाचे स्वरुप | १२ हजार रुपये विद्यावेतन (प्रति उमेदवार, प्रति महिना ). मोफत प्रशिक्षण<br>संस्था पेमेंट अंदाजे १८ लाख रुपये (एकदा). योजना कालावधी ११ महिने. |
| | निवड प्रक्रिया | चाळणी परीक्षेद्वारे प्राप्त गुण व आरक्षणनिहाय निवड करण्यात येते. |
| १२ | योजनेचे नाव | **यूपीएससीसाठी आर्थिक सहाय्य ( मुख्य परीक्षा )** |
| | | नागरी सेवा (पूर्व) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आणि मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना आर्थिक सहाय्य योजना. |
| | लाभाचे स्वरुप | ५० हजार रुपये (एकदा) यूपीएससी नागरी सेवा (पूर्व) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना. |
| १३ | योजनेचे नाव | **यूपीएससीसाठी आर्थिक सहाय्य ( व्यक्तिमत्व चाचणी )** |
| | | नागरी सेवा (मुख्य) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आणि व्यक्तिमत्व चाचणीसाठी पात्र ठरलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांना आर्थिक सहाय्य दिले जाते. |
| | लाभाचे स्वरुप | २५ हजार रुपये (एकदा) यूपीएससी नागरी सेवा (मुख्य) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना. |
| १४ | योजनेचे नाव | **यूपीएससी पूर्व परीक्षा सहाय्य योजना** |
| | | फॉरेस्ट सर्व्हिसेस (पूर्व) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आणि मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना आर्थिक सहाय्य दिले जाते. |
| | लाभाचे स्वरुप | ५० हजार रुपये (एकदा) यूपीएससी फॉरेस्ट सर्व्हिसेस (पूर्व) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना. |
| १५ | योजनेचे नाव | **यूपीएससी मुख्य परीक्षा सहाय्य (फॉरेस्ट सर्व्हिसेस)** |
| | | फॉरेस्ट सर्व्हिसेस (मुख्य) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आणि व्यक्तिमत्त्व चाचणीसाठी पात्र ठरलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांना आर्थिक सहाय्य दिले जाते. |
| १६ | योजनेचे नाव | **यूपीएससी मुख्य परीक्षा पात्र सहाय्य (अभियांत्रिकी सेवा)** |
| | | यूपीएससी अभियांत्रिकी सेवा (पूर्व) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आणि (मुख्य) परीक्षेसाठी पात्र ठरलेल्यांना महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना आर्थिक सहाय्य दिले जाते. |

| | | |
|---|---|---|
| १७ | **योजनेचे नाव** | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग** |
| | | राज्यसेवा, तांत्रिक, अभियांत्रिकी, वनसेवा, न्यायिक सेवा, महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा अंतर्गत निरीक्षक (ब गट), अन्न व औषध प्रशासकीय सेवा (ब गट), कृषी अधिकारी ( अ व ब गट) या परीक्षांच्या मुख्य व व्यक्तिमत्त्व चाचणीकरिता आर्थिक सहाय्य. |
| | **पात्रतेचे निकष** | उमेदवाराकडे महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा दाखला व अधिवास असावा.<br>महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पूर्व व मुख्य परीक्षा प्रवेशपत्र तसेच उत्तीर्ण असल्याची निकालाची प्रत.<br>मुख्य परीक्षा व मुलाखत चाचणीचे प्रवेशपत्र. |
| | **लाभाचे स्वरुप** | मुख्य परीक्षेकरिता १५ हजार रुपये (एकरकमी).<br>व्यक्तिमत्त्व चाचणीकरिता १० हजार रुपये (एकरकमी). |
| १८ | **योजनेचे नाव** | **जेईई आणि नीट (JEE/NEET ) प्रशिक्षण कार्यक्रम** |
| | | अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांकडून परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज मागविले जातात. विद्यार्थ्यांची निवड दहावीमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे आणि आरक्षण निकषांनुसार करण्यात येते. |
| | **पात्रतेचे निकष** | उमेदवाराकडे महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा दाखला व अधिवास असावा.<br>समांतर योजनेचा लाभ न घेतल्याचे हमीपत्र असावे.<br>वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांच्या आत असावे.<br>विद्यार्थी ११ वी विज्ञान शाखेत शिकणारा असावा.<br>पात्र विद्यार्थ्यांना प्रशिक्षणादरम्यान रोज ४ तास किंवा अधिक प्रशिक्षण दिले जाईल. महिन्यात ७५ टक्क्यांपेक्षा जास्त उपस्थिती आवश्यक.<br>प्रशिक्षण कालावधी २४ महिने. |
| | **आरक्षण** | महिलांसाठी ३० टक्के.<br>अनुसूचित जाती अंतर्गत वंचित जातींमध्ये मांग, मातंग, होलार, वाल्मिकी यांच्यासाठी ५ टक्के.<br>दिव्यांगांसाठी ४ टक्के.<br>अनाथांसाठी १ टक्के. |
| | **लाभाचे स्वरुप** | पुस्तक संचासाठी प्रति विद्यार्थ्यास ५ हजार रुपये.<br>६ हजार रुपये प्रति महिना विद्यावेतन . |

### बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना

दहावीत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या १०० विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी प्रत्येकी २५ हजार रुपयांची किंवा पदवीपर्यंतच्या शिक्षणासाठी शैक्षणिक शुल्क शिष्यवृत्ती म्हणून दिले जाते. इयत्ता १ ली ते १० वी मधील दोन्ही सत्र परीक्षेत 'ब' किंवा त्यापेक्षा वरील श्रेणी मिळविणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना १ हजार ते २ हजार रुपयांपर्यंत शिष्यवृत्ती दिली जाते.

### मोफत पाठ्यपुस्तक वितरण

महानगरपालिकेच्या इयत्ता १ ली ते ८ वीतील विद्यार्थ्यांना तसेच खासगी अनुदानित शाळांमधील १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना समग्र शिक्षा मोफत पाठ्यपुस्तक योजना अंतर्गत शालेय साहित्य वितरण करण्यात येते. यामध्ये शालेय गणवेश, वह्या, बूट, मोजे यासह २७ प्रकारच्या वस्तूंचा समावेश असतो.




बाबासाहेबांच्या जीवन प्रवासावर आधारित
"डॉ. बाबासाहेब आंबेडकर" हा चित्रपट दिग्दर्शक जब्बार पटेल यांनी तयार केला. या चित्रपटातून बाबासाहेबांचा संपूर्ण जीवन प्रवास मांडला. आशयसंपन्न असा हा चित्रपट पाहण्यासाठी सोबत दिलेला क्यू आर कोड स्कॅन करा...



# विद्या, प्रज्ञा, करुणा, शील व मैत्री या पंचतत्त्वानुसार प्रत्येक विद्यार्थ्याने आपले चारित्र्य बनविले पाहिजे

छत्रपती संभाजीनगर ( तत्कालीन औरंगाबाद) येथील मिलिंद महाविद्यालयातील बोधी मंडळाच्या विद्यमाने दिनांक १२ डिसेंबर १९५५ रोजी सभा भरविण्यात आली होती. या सभेला मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना निमंत्रित करण्यात आले होते, त्यांनी आपल्या भाषणात म्हटले की,

"विद्या ही अन्नासारखी सर्व मनुष्यास आवश्यक आहे . प्रत्येकाला तिचा लाभ झाला पाहिजे. मनुष्य रागीट असला तर त्याच्यावर टीका करू नये. राग दोन प्रकारचे असतात (१) द्वेषमूलक, (२) प्रेममूलक. जो कसाई असतो तो कुऱ्हाड घेऊन जातो. त्याचा राग हा द्वेषमूलक असतो. आईने आपल्या मुलाला चापट मारली तर तिला कोण काय म्हणेल ? तिचा राग असतो तो प्रेममूलक असतो. मुलाने सदाचारी व्हावे म्हणून आई मुलाला मारीत असते. माझा रागही प्रेममूलक आहे.

तुम्ही सर्वजण विद्या शिकण्यासाठी आला आहात पण माझ्या मते केवळ विद्याच पवित्र असू शकत नाही. विद्येबरोबर भगवान बुद्धांनी सांगितलेली प्रज्ञा म्हणजे शहाणपणा, शील म्हणजे सदाचरणानं संपन्न असं आचरण, करुणा म्हणजे सर्व मानव जातीसंबंधी प्रेमभाव आणि मैत्री म्हणजे सर्व प्राणिमात्रांविषयीची आत्मियता या चार पारमिता असल्या पाहिजेत तरच विद्वत्तेचा काही उपयोग आहे. विद्येबरोबरच मानवाजवळ जर करुणा नसली तर तो कसाई आहे, असे मी समजतो. करुणा म्हणजे माणसा-माणसावरचं प्रेम, ह्याच्यापुढेही मनुष्य गेला पाहिजे व त्याने मैत्री संपादन केली पाहिजे.

विद्या, प्रज्ञा, करुणा, शील व मैत्री या पंचतत्वानुसार मिलिंद महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याने आपले चारित्र्य बनविले पाहिजे आणि या मार्गाने एकट्यानेच जावे लागले तरी मनोधैर्य व निष्ठा राखून गेले पाहिजे.

(संदर्भ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे. खंड १८, भाग ३)



डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माईसाहेब आंबेडकर मिलिंद कॉलेजच्या प्रांगणात शिक्षण क्षेत्रातील आपल्या सहकाऱ्यांसह (जुलै, १९५३).



“ जे झगडतात तेच पुढे येतात.”



# शिक्षित मुले समाजाच्या उन्नतीप्रीत्यर्थ काही करणार आहेत का ?

दिनांक २० जुलै १९५२ रोजी महार समाज सेवा संघाच्या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की,

"तुम्ही हे सामाजिक कार्य करता त्याबद्दल मला समाधान वाटते. तुमच्या संगमनेर वसतिगृहाच्या इमारत फंडास मी शुभेच्छा प्रकट करतो. पण लोकांना एक प्रश्न विचारावासा वाटतो तो हा की, तुम्ही या समाजाच्या मुलांना स्वतः खस्ता खाऊन शिक्षण देता ती मुले शिक्षण संपादन केल्यानंतर तुमच्या समाजाच्या उन्नतीप्रीत्यर्थ काही करणार आहेत का? तुम्ही त्यांच्याकडून याबाबत काही प्रतिज्ञा लेख लिहून घेता काय ? (नाही. असे उत्तर मिळाल्यावर) पददलित समाजाची सेवा करण्यासाठी आपल्यातील काही मुले शिकून तयार व्हावीत म्हणून मी सिद्धार्थ कॉलेज काढले पण अनुभव मात्र कटू येत आहे. शिक्षण संपादन केल्यानंतर एखादी मोठी नोकरी मिळाली की बस्स ! झाले आपले काम !! मी कोण आहे ? मला शिक्षण कोणी ? कसे दिले ? त्यांनी किती कष्ट केले ? याची तिळमात्र जाणीव न ठेवता हे लोक आपल्या समाजाला विसरतात. या लोकांना काय म्हणावे हेच मला समजत नाही, तेव्हा तुम्ही हा खटाटोप करता तो फुकट आहे असे मला वाटते. नाहीतर त्यांच्यावर काहीतरी बंधनकारक राहील असे करा. कोणाची पोरे बोर्डिंगात आणायची ? त्यांना शिक्षण द्यायचे कोणी? आणि इतके केल्यावर त्यांनी समाजाकडे ढुंकूनही पाहायचे नाही. हा कृतघ्नपणा नव्हे का ? माझे आयुष्य मी तुमच्या हितार्थ वेचतो आहे. पण माझ्या पश्चात या समाजाचे कसे होईल ? ही माझी चिंता दूर करणारी माणसे तुमच्यात अजून तयार होऊ नयेत? या सर्व गोष्टींचा विचार केला की, मी माझे आयुष्य तुमच्यासाठी फुकट खर्ची घातले, असे वाटू लागते."

(संदर्भ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे. खंड १८, भाग ३)



आंबेडकर स्कूल ऑफ पॉलिटिक्स या संस्थेचे पदाधिकारी, सदस्य व शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशनचे नेते यांच्यासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर (पुणे ४ ऑक्टोबर १९४५)

# शासकीय नोकरीसंदर्भात जाहिरात प्रसिद्ध करणारी निवडक संकेतस्थळे

| | |
|---|---|
| १ | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) - https://mpsconline.gov.in** |
| | महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीतील विविध पदांसाठी स्पर्धा परीक्षा घेऊन उमेदवारांची निवड करणारी संस्था आहे. |
| २ | **केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) - https://upsconline.nic.in** |
| | केंद्रीय लोकसेवा आयोग ही संस्था अखिल भारतीय सेवा तसेच संघ सेवेच्या गट 'अ' व गट 'ब' कर्मचाऱ्यांच्या विविध पदांच्या भरती परीक्षेसाठी कार्यरत आहे. |
| ३ | **आयबीपीएस (IBPS) - https://www.ibps.in** |
| | आयबीपीएस (IBPS) म्हणजे 'इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सनल सिलेक्शन' ही राष्ट्रीयकृत बँक तसेच अन्य विभागांच्या विविध पदांसाठी भरती परीक्षा आयोजित करणारी एक संस्था आहे. याद्वारे प्रोबेशनरी ऑफिसर (PO), लिपिक आणि स्पेशालिस्ट ऑफिसर (SO) यांसारख्या पदांसाठी परीक्षा घेतल्या जातात. |
| ४ | **स्टाफ सिलेक्शन कमिशन (SSC) - https://ssc.nic.in** |
| | ही संस्था केंद्रीय शासकीय विभागांसाठी विविध परीक्षा आयोजित करते. या परीक्षांमध्ये एसएससी सीजीएल, एसएससी सीएचएसएल, एसएससी एमटीएस इत्यादींचा समावेश होतो. |
| ५ | **'आरआरबी' (RRB) - https://www.rrbmumbai.gov.in** |
| | आरआरबी' (RRB) म्हणजे रेल्वे भरती बोर्ड असून हे भारतीय रेल्वेच्या विविध विभागांमध्ये विविध पदांसाठी भरती प्रक्रिया राबवते. सहायक लोको पायलट, कमर्शियल अप्रेंटिस, ग्रुप डी, एनटीपीसी आणि इतर अनेक पदांचा यामध्ये समावेश आहे. या परीक्षा इंग्रजी, हिंदी, मराठीसह अन्य प्रादेशिक भाषांमध्ये घेतल्या जातात. |

| | | |
|---|---|---|
| ६ | **महाराष्ट्र शासन- https://www.maharashtra.gov.in/Site/1548/Jobs (विद्यावेतन)** | |
| | महाराष्ट्र शासनाचे हे अधिकृत संकेतस्थळ आहे. या ठिकाणी विविध शासकीय योजना, परिपत्रक, ऑनलाईन अर्ज सेवा, नोकरीविषयक माहिती आदी बाबी उपलब्ध आहेत. | |
| ७ | **महास्वयम् कर्मचारी नियोक्ता मंच - https://rojgar.mahaswayam.gov.in** | |
| | महास्वयम् संकेतस्थळावर नोकरी, प्रशिक्षण, उद्योग याबाबत माहिती दिली जाते. | |
| ८ | **एम्प्लॉयमेंट न्यूज- https://employmentnews.gov.in** | |
| | केंद्र शासनाच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयामार्फत प्रकाशित केले जाणारे प्रमुख साप्ताहिक आहे. हे साप्ताहिक इंग्रजीत Employment News, हिंदीत रोजगार समाचार आणि उर्दूमध्ये रोजगार समाचार या नावाने प्रकाशित केले जाते. करिअर मार्गदर्शनाशी संबंधित माहिती आणि नोकरीविषयक जाहिराती या साप्ताहिकामधून प्रकाशित होतात. | |
| ९ | **महाजॉब - https://mahabharti.in** | |
| | महाराष्ट्रातील विविध जिल्हे आणि खेड्यापाड्यातील ग्रामीण तसेच शहरी युवकांना त्यांच्या कौशल्याला साजेसा सर्वोत्तम जॉब मिळवण्याची व यशस्वी करिअर घडवण्याची संधी महाराष्ट्र शासन उपलब्ध करून देत आहे. राज्यातील कंपन्यांना लागणारे कुशल, अर्धकुशल व अकुशल असे सर्व प्रकारचे मनुष्यबळ महाजॉबच्या माध्यमातून पुरवले जाते. नोकरीच्या शोधात असलेल्या महाराष्ट्रातील तरुणांना रोजगाराची संधी निर्माण होते. | |
| १० | **माहिती व जनसंपर्क महासंचालनालय https://dgipr.maharashtra.gov.in** | |
| | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय हा महाराष्ट्र शासनाचा विभाग आहे. माहिती, जनसंपर्क क्षेत्राशी निगडित या विभागामार्फत राज्य शासनाच्या विविध योजना तसेच नोकरीविषयक माहिती प्रकाशित केली जाते. | |

| | | |
|---|---|---|
| ११ | नॅशनल गव्हर्मेंट सर्व्हिसेस https://services.india.gov.in/service/listing?ln=en&cat_id=2 | |
| | नॅशनल गव्हर्मेंट सर्व्हिसेस या संकेतस्थळावर नोकरी, प्रशिक्षण, उद्योग याबाबत माहिती दिली जाते. | |
| १२ | DIGITAL INDIA CORPORATION https://dic.gov.in/careers/ | |
| | DIGITAL INDIA CORPORATION वरच्या संकेतस्थळावर देशस्तरावरील विविध ठिकाणच्या नोकऱ्यांची माहिती मिळते. ज्याद्वारे प्रामुख्याने तरुण वर्ग आपल्या कारकीर्दीला एक नवी चालना देऊ शकतो. | |
| १३ | महाराष्ट्र राज्य शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग https://sjsa.maharashtra.gov.in/ | |
| | सदर संकेतस्थळ हे महाराष्ट्र राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अंतर्गत येते. विविध शिष्यवृत्ती योजना तसेच नोकरीच्या संधीबद्दलची माहिती देखील यावर वेळोवेळी पुरविण्यात येते. | |
| १४ | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था https://www.barti.in/ | |
| | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या या संकेतस्थळावर विविध शिष्यवृत्ती योजना तसेच नोकरीच्या संधीबद्दल वेळोवेळी माहिती पुरविण्यात येते. | |

## महाराष्ट्रातील प्रमुख स्थानिक स्वराज्य संस्था अर्थात महानगरपालिकांची संकेतस्थळे, ज्यावर नोकरीच्या संधीविषयक माहिती वेळोवेळी प्रकाशित केली जाते.

| | |
|---|---|
| १ | बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) - https://www.mcgm.gov.in |
| २ | नवी मुंबई महानगरपालिका- https://www.nmmc.gov.in |
| ३ | ठाणे महानगरपालिका - https://thanecity.gov.in |
| ४ | पुणे महानगरपालिका - https://www.pmc.gov.in |
| ५ | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका - https://chhsambhajinagarmc.org |
| ६ | नागपूर महानगरपालिका - https://www.nmcnagpur.gov.in |



“तुम्ही वाघासारखे बना म्हणजे तुमच्या वाटेला कुणीही जाणार नाही.”

राज्यातील विद्यापीठांमध्ये विविध अभ्यासक्रम राबविले जातात. तसेच विविध रोजगारही उपलब्ध केले जातात. याबाबतची माहिती संबंधित विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असते.

| | |
|---|---|
| १ | राज्य विद्यापीठे ( State Public Universities ) |
| | मुंबई विद्यापीठ - https://mu.ac.in/<br>एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ - https://sndt.ac.in/<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ - https://www.unipune.ac.in/<br>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ - https://nagpuruniversity.ac.in/<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ - https://bamua.digitaluniversity.ac/<br>शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर - https://unishivaji.ac.in/<br>संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ - https://sgbau.ac.in/<br>स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ , नांदेड - https://srtmun.ac.in/<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ - https://www.sus.ac.in/<br>कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ - https://nmu.ac.in/en-us/<br>गोंडवाना विद्यापीठ - https://unigug.ac.in/<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - https://ycmou.ac.in/<br>महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर - https://mafsu.ac.in/<br>महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक - www.muhs.ac.in<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ - https://dbatu.ac.in/<br>डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला - https://www.pdkv.ac.in/<br>वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी - https://www.vnmkv.ac.in/<br>महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी - https://mpkv.ac.in/<br>डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली - https://www.dbskkv.org/<br>कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा - https://unikbp.ac.in/ |
| २ | खासगी / स्वायत्त विद्यापीठे ( Private Universities) |
| | अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणे - https://adypu.edu.in/<br>फ्लेम विद्यापीठ, पुणे- https://www.flame.edu.in/<br>ॲमिटी विद्यापीठ, मुंबई - https://www.amity.edu/mumbai/<br>छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ, पनवेल - https://csmu.ac.in/<br>व्ही. आय. टी., पुणे - https://www.vit.edu/<br>संदीप विद्यापीठ, नाशिक - https://www.sandipuniversity.edu.in/<br>संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर - https://www.sgu.edu.in/<br>एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर - https://www.mgmu.edu.in/ |

| | |
|---|---|
| ३ | **अभिमत विद्यापीठे ( Deemed Universities)** |
| | टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई - https://tiss.ac.in/<br>इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई- https://www.ictmumbai.edu.in/<br>दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, वर्धा - https://dmiher.edu.in/dmiher-uat/<br>कृष्णा इन्स्टिट्यूट, कराड - https://www.kimskarad.in<br>प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, लोणी - https://pravara.com/<br>सिम्बोयसिस इंटरनॅशनल, पुणे - https://www.siu.edu.in/<br>भारती विद्यापीठ, पुणे - https://www.bvuniversity.edu.in/<br>होमी भाभा नॅशनल इन्स्टिट्यूट, मुंबई - http://hbni.ac.in/<br>टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे - https://www.tmv.edu.in/<br>नरसी मोनजी इन्स्टिट्यूट, मुंबई - https://nmims.edu/<br>डेक्कन कॉलेज, पुणे - https://www.dcpune.ac.in/<br>इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर पॉप्युलेशन सायन्सेस, मुंबई - https://iipsindia.ac.in/<br>सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फिशरीज एज्युकेशन, मुंबई - https://cife.edu.in/<br>MIT वर्ल्ड पीस, पुणे - https://mitwpu.edu.in/<br>डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ एडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी, पुणे - https://diat.ac.in/ |

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवा-सुविधांविषयी अनुयायी सांगतात...

आम्ही नागपूरहून ३ डिसेंबरला मुंबईत आलो. येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेने आमच्या खाण्याची, पिण्याच्या पाण्याची, निवाऱ्याची चांगली सोय केली आहे.

- सविता कांबळे, ता. उमरेड, जि. नागपूर

बृहन्मुंबई महानगरपालिकेने महापरिनिर्वाण दिनाची चांगली तयारी केली आहे. सगळ्या सुविधा व्यवस्थित आहेत. लाखो नागरिकांची गैरसोय होणार नाही याची महानगरपालिकेने काळजी घेतली आहे.

- डॉ. नितीन हांडे, पुणे

छत्रपती शिवाजी महाराज मैदानात धूळ उडू नये यासाठी येण्या-जाण्याच्या मार्गावर चटई टाकण्यात आली आहे. महानगरपालिका प्रशासन अनुयायांच्या आरोग्याची काळजी घेते, हे पाहून समाधान वाटले.

- गौतम भंतेजी, असुंगर

बृहन्मुंबई महानगरपालिकेने ठिकठिकाणी भोजनाची व्यवस्था केली आहे. डॉक्टरांची टीमसुद्धा सदैव तत्पर आहे. महानगरपालिकेने अनुयायांसाठी आंघोळीची, प्रसाधनगृहांची तसेच परिसर स्वच्छतेची व्यवस्था उत्तम ठेवली आहे.

- नरेंद्र अरसरमळ, बुलढाणा

चैत्यभूमीवर आलेल्या लाखो अनुयायांची बृहन्मुंबई महानगरपालिकेने अतिशय चांगली व्यवस्था केली आहे. दोन ते तीन दिवस अनुयायी येथे असतात. या कालावधीत त्यांची गैरसोय होऊ नये म्हणून महानगरपालिकेने उत्तम सुविधा दिल्या आहेत. आंबेडकरी चळवळीच्या आणि जनतेच्या वतीने आम्ही महानगरपालिकेचे आभार मानतो.

- केतन सोनावणे, नाशिक

# महापरिनिर्वाण दिनी अनुयायांना जाहीर आवाहन

- महापरिनिर्वाणदिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपापल्या घरुन अभिवादन करता यावे, यासाठी चैत्यभूमी येथून थेट प्रक्षेपण समाज-माध्यमांवर (सोशल मीडिया) उपलब्ध.

mybmcmymumbai mybmc mybmc

- महापरिनिर्वाण दिन हा सर्वांनी गांभीर्यपूर्वक पाळावा, सर्वांशी सौजन्याने वागावे.
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या विचारांचे चिंतन आणि अनुकरण करावे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना सदाचारी जीवन जगण्याचा संकल्प करावा.
- महानगरपालिका, पोलीस दल आणि समता सैनिक दल कार्यकर्ते यांच्या सुचनांचे अनुयायांनी पालन करावे.
- अनुयायांनी भगवान बुद्धांच्या शांततेचा मार्ग अवलंबून सामुदायिक वंदना घ्यावी. त्यावेळी शांतता पाळावी व इतरांना शांत रहावयास सांगावे.
- या दिनी भगवान बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित साहित्य, पुस्तके, सीडी, धम्मध्वज, बिल्ले तसेच विज्ञानवादी विचारांवर आधारित धम्म दिनदर्शिका / पुस्तके विकत घ्यावीत. ती वाचावीत व इतरांना वाचायला द्यावीत!
- या दिनी कोणत्याही प्रकारचे वाद्य वाजवू नये, घोषणा देऊ नये.
- लहान मुले, गरोदर स्त्रिया, ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग व्यक्तींना कृपया प्राधान्य द्यावे.
- अंधश्रद्धा तसेच अफवा पसरवणाऱ्यांपासून सावध रहावे. गर्दी टाळण्यासाठी ठरलेल्या मार्गाचा वापर करावा.
- घातपाती कृत्ये / दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक अनुयायाने जागृत पोलिसांसारखी दक्षता बाळगावी. संशयित व्यक्ती, वस्तू आढळल्यास त्यांच्यावर पाळत ठेऊन तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा किंवा मदतीसाठी १०० क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच आपल्या मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी.
- कोणत्याही प्रकारच्या मदतीकरिता पोलीस नियंत्रण कक्ष, महानगरपालिका कक्ष तसेच कार्यकर्ते / समन्वयक यांच्याशी संपर्क साधावा. आपली वाहने योग्यरितीने पार्क करावीत.
- रहदारीच्या मार्गांमध्ये घोळक्याने उभे राहून नागरिकांना अडथळा करु नये.
- समुद्र किनारी सजगता बाळगावी. पर्यावरण व स्वच्छतेची काळजी घ्यावी.
- चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदान आणि अनुयायांचा वावर असलेले सर्व परिसर स्वच्छ राखावे.
- महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या कचरा कुंडीतच कचरा टाकावा.
- महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेले पिण्याचे/ वापराचे पाणी, अन्न वाया जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच महानगरपालिकेकडून पुरविण्यात आलेल्या सोयी-सुविधांचा योग्य लाभ घ्यावा.
- स्तनदा मातांकरिता हिरकणी कक्ष उपलब्ध करून देण्यात आला आहे, त्याचा लाभ घ्यावा.
- अनुयायांकरिता वैद्यकीय मदत कक्ष उपलब्ध करून देण्यात आले आहेत, त्याचा आवश्यकतेनुसार लाभ घ्यावा.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे, त्यागाचे स्मरण करणे आणि त्यांचे अनुकरण करणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या २२ प्रतिज्ञा

- मी ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
- मी राम व कृष्ण यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
- मी गौरी-गणपती इत्यादी हिंदू धर्मातील कोणत्याही देवदेवतेस मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
- देवाने अवतार घेतले यावर माझा विश्वास नाही.
- बुद्ध हा विष्णूचा अवतार आहे हा खोटा आणि खोडसाळ प्रचार होय, असे मी मानतो.
- मी श्राद्धपक्ष करणार नाही ; पिंडदान करणार नाही.
- बौद्ध धम्माच्या विरुद्ध विसंगत असे कोणतेच आचार कर्म मी करणार नाही.
- कोणतेही क्रियाकर्म ब्राह्मणांच्या हातून करवून घेणार नाही.
- सर्व मनुष्यमात्र समान आहेत, असे मी मानतो.
- मी समता स्थापन करण्याचा प्रयत्न करीन.
- मी भगवान बुद्धाने सांगितलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब करीन.
- मी भगवान बुद्धाने सांगितलेल्या दहा पारमिता पाळीन.
- मी सर्व प्राणिमात्रांवर दया करीन, त्यांचे लालनपालन करीन.
- मी चोरी करणार नाही.
- मी खोटे बोलणार नाही.
- मी व्यभिचार करणार नाही.
- मी दारु पिणार नाही.
- मी प्रज्ञा, शील आणि करुणा या बौद्ध धम्माच्या तीन तत्त्वांची सांगड घालून माझे जीवन चालविन.
- माझ्या जुन्या मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानिकारक असणाऱ्या आणि मनुष्यमात्राला असमान व नीच मानणाऱ्या हिंदू धर्माचा त्याग करतो व बुद्धाच्या धम्माचा स्वीकार करतो.
- बुद्ध धम्म हा सधम्म आहे, अशी माझी खात्री पटलेली आहे.
- माझा नवा जन्म होत आहे, असे मी मानतो.
- इतःपर मी बुद्धाच्या शिकवणीप्रमाणे वागेन, अशी प्रतिज्ञा करतो.



“ आपल्यात संघशक्ती उत्पन्न करण्यास आपणांस सर्व अस्पृश्य जातीस व्यापक अशी एक संस्था असणे फार जरुर आहे. ”

## महामानवाचे महापरिनिर्वाण



६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिल्ली येथे महापरिनिर्वाण झाल्यानंतर ७ डिसेंबर रोजी मुंबईत त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी लाखो लोक मूकपणे १० तास रांगेत उभे होते. साऱ्या मुंबई महानगरीवर दु:खाची छाया पसरली होती. दुपारी दीड वाजता राजगृहावरुन अंत्ययात्रा निघाली. सुमारे दोन-तीन मैल लांबीची ही अंत्ययात्रा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग (तेव्हाचा व्हिसेंट रोड), एल्फिन्स्टन पूल, सयानी मार्ग, गोखले मार्ग या रस्त्यांनी सुमारे सात तासांनंतर छत्रपती शिवाजी महाराज मैदान (तेव्हाचे शिवाजी पार्क) जवळील स्मशानभूमीवर पोहोचली. 'बाबासाहेब अमर रहे' च्या घोषणा देत अथांग जनसागराने महामानवाला अखेरचा निरोप दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास आणि महापरिनिर्वाणानंतर निघालेल्या अंत्ययात्रेची चित्रफीत पाहण्यासाठी बाजूचा क्यू आर कोड स्कॅन करा.

"तुम्ही सर्वांनी-स्त्रीपुरुषांनी- खात्री बाळगली पाहिजे की तुमचा उद्धार करण्यास दुसरे कोणीही येणार नाही, किंवा तो मीही करणार नाही. जर मनात आणाल तर तुमचा उद्धार तुम्हीच करून घेण्यास समर्थ व्हाल."



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चैत्यभूमी (दादर) येथील स्मारक.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास अभिवादन करताना महाराष्ट्राचे तत्कालीन मा. राज्यपाल श्री. सी. पी. राधाकृष्णन, मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उप मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, मा. उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार तसेच मा. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगरे जिल्हा सहपालकमंत्री श्री. मंगलप्रभात लोढा, मा. विधान परिषद सदस्य श्री. प्रवीण दरेकर आणि इतर मान्यवर.

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापरिनिर्वाण दिनी दरवर्षी दिल्या जाणाऱ्या नागरी सेवा-सुविधा



डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त माहिती पुस्तिकेचे प्रकाशन (५ डिसेंबर २०२४)




अनुयायांच्या निवाऱ्यासाठी १ लाख चौरस फूट क्षेत्रफळावर मंडप



स्नानगृहांची व्यवस्था



छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे मोफत वैद्यकीय सेवा-सुविधा

(छायाचित्रे : दिनांक ६ डिसेंबर २०२४)



चित्रफीत पाहण्यासाठी बाजूचा क्यू आर कोड स्कॅन करा

## महामानवाला अभिवादन करण्यासाठी जमलेला अथांग जनसागर



## दिनांक ०४ डिसेंबर ते ०७ डिसेंबर २०२५ पर्यंतचे भरती व ओहोटीचे वेळापत्रक

| गुरुवार दि. ०४.१२.२०२५ | | | |
|---|---|---|---|
| | वेळ | | उंची (मीटर) |
| भरती | सकाळी | १०:४० | ४.०६ मी. |
| ओहोटी | सायंकाळी | ०४:५९ | ०.१० मी. |
| भरती | रात्री | ११:५२ | ४.९६ मी. |

| शुक्रवार दि. ०५.१२.२०२५ | | | |
|---|---|---|---|
| | वेळ | | उंची (मीटर) |
| ओहोटी | पहाटे | ०५:५० | १.६८ मी. |
| भरती | सकाळी | ११:३० | ४.१४ मी. |
| ओहोटी | सायंकाळी | ०५:४३ | ०.०२ मी. |

| शनिवार दि. ०६.१२.२०२५ | | | |
|---|---|---|---|
| | वेळ | | उंची (मीटर) |
| भरती | मध्यरात्री | ००:३९ | ५.०३ मी. |
| ओहोटी | सकाळी | ०६:४२ | १.६० मी. |
| भरती | दुपारी | १२:२० | ४.१७ मी. |
| ओहोटी | सायंकाळी | ०६:३० | ०.०८ मी. |

| रविवार दि. ०७.१२.२०२५ | | | |
|---|---|---|---|
| | वेळ | | उंची (मीटर) |
| भरती | मध्यरात्री | ०१:२७ | ५.०१ मी. |
| ओहोटी | सकाळी | ०७:३४ | १.५४ मी. |
| भरती | दुपारी | ०१:१० | ४.१५ मी. |
| ओहोटी | सायंकाळी | ०७:१५ | ०.२७ मी. |




महानगरपालिका नियंत्रण कक्ष
तात्पुरत्या निवाऱ्यासाठी मंडपाची व्यवस्था
अभिवादन रांग
बाहेर जाण्याचा मार्ग
वैद्यकीय कक्षाकडे जाण्याचा मार्ग
छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे फिरती शौचालये
रांगेतील अनुयायांसाठी फिरती शौचालये
स्नानगृहे
निरीक्षण मनोरे (वॉच टॉवर्स)
वैद्यकीय कक्ष
माननीय भंतेजी निवास व्यवस्था
रूग्णवाहिका
पिण्याच्या पाण्याची व्यवस्था (टँकर)
पोलिस नियंत्रण कक्ष
अन्न वाटपाची व्यवस्था
पुस्तके, धार्मिक साहित्य विक्रेता विभाग
कॅसेट्स, सीडीज, विक्रेता विभाग
विद्युत खांब
तात्पुरते अग्निशमन केंद्र
जीवरक्षक बोटीची व्यवस्था
तात्पुरती शौचालये
पाण्याची सुविधा
दादर रेल्वे स्थानकापासून चैत्यभूमीकडे जाण्याचा मार्ग
माहिती कक्ष
प्लाझा सिनेमा



# छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथील ६ डिसेंबर २०२५ रोजीची प्रस्तावित व्यवस्था



## ■ बृहन्मुंबई महानगरपालिकेचे महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक

| | |
|---|---|
| महानगरपालिका नियंत्रण कक्ष | १९१६, २२६९ ४७२७<br>२२६९ ४७२५/ २२७० ४४०३ |
| महानगरपालिका अग्निशमन दल (भायखळा) | १०१, २३०७ ६१११, २३००१३९३९४/९५ |
| महानगरपालिका अग्निशमन दल (वडाळा) | २४१३ २०६०-६२, २४१३२०५८ |
| घनकचरा व्यवस्थापन नियंत्रण कक्ष (शहर) | २४९३ ५६८९ |
| महानगरपालिका आयुक्त | २२६२ ०५२५ |
| अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) | २२६२ ०४३३ |
| अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) | २२६२ ०८०९ |
| अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) | २२६२ ०१४९ |
| अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) | २२६२ ३००४ |
| उप आयुक्त (परिमंडळ- २) | २४१५ ०४०० / २४१३२५४५/४६/६० |
| सहायक आयुक्त- 'जी उत्तर' विभाग | ६९५१ ७८०० / ६९५१ ७८०५ |

## ■ इतर महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक

| | |
|---|---|
| मंत्रालय (नियंत्रण कक्ष) | २२०२ ७९९०/ २२०२ ४२४३ |
| मुंबई पोलिस नियंत्रण कक्ष | १०० आणि २२६२ ५०२० |
| मुंबई पोलिस उप आयुक्त (परिमंडळ- ५) | २४८८ ८४२१ / २४९२ ७३०८ |
| वाहतूक पोलिस | २४९३ ७७५५ |
| वाहतूक पोलिस नियंत्रण कक्ष (वडाळा) | ८६५७० ४५०१३ किंवा २४१४ ६५३३ |
| आणीबाणी वैद्यकिय सहाय्य (रुग्णवाहिका) | १०८ |
| बेस्ट वाहतूक 'टोल फ्री' क्रमांक | १८०० २२७५५० |
| विद्युत पुरवठा (बेस्ट) (दादर नियंत्रण कक्ष-उत्तर) | २४१४ ४८९७ व २४१४ ५८८८ |
| नागरी संरक्षण दल | २२८४ ३६६७ |
| गृहरक्षक दल (होमगार्ड) मुख्यालय | २२८४ २४२३ / २२८४ ४१७१ (नियंत्रण कक्ष) |
| पश्चिम रेल्वे (चर्चगेट) | २२०८ ४२८७ |
| पश्चिम रेल्वे (मुंबई सेंट्रल) | २३०७ ०५६४ |
| मध्य रेल्वे नियंत्रण कक्ष | २२६२ ०३७७ |
| दूरदर्शन | २४९६ ५८०० |
| आकाशवाणी | ९४०३९ १६८३३ |
| दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (चैत्यभूमी) | २४१८ ५५९७ / ९८६७० ८७२५१ |
| पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे डॉ. आंबेडकर महाविद्यालय (वाणिज्य आणि अर्थशास्त्र), (वडाळा) मुंबई | २४१२ २३९६ / २४१६ ३३०० |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समिती | ९८२०५ २१५४४ / ९८१९४ ९०८६८ |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सन २०२० ते २०२४ दरम्यान प्रकाशित माहिती पुस्तिका पाहण्यासाठी खालील 'क्यू आर कोड' स्कॅन करा.




२०२१




२०२२




२०२३




२०२०




२०२४

**माहिती पुस्तिकांबाबत आपल्या सूचना, अभिप्राय कळवा**

जनसंपर्क विभाग, तळमजला, विस्तारित इमारत, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, महापालिका मार्ग, मुंबई ४००००१.
civicpro11@gmail.com



"आज आमचे जे काही आहे,
ते सर्व तुझेच आहे,
हे जगणे आणि मरणे,
हे शब्द आणि ही जीभ,
हे सुख आणि दु:ख,
हे स्वप्न आणि वास्तव,
ही भूक आणि तहान,
सर्व पुण्याई तुझीच आहे,
सर्व पुण्याई तुझीच आहे"

– पद्मश्री नामदेव ढसाळ

वरील कविता ऐकण्यासाठी 'क्यू आर कोड' स्कॅन करा.

| प्रशांत सपकाळे<br>उप आयुक्त (परिमंडळ-२) | डॉ. अश्विनी जोशी<br>अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त(शहर) | भूषण गगराणी<br>महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक |
|---|---|---|

**तानाजी कांबळे**, जनसंपर्क अधिकारी, यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय येथून प्रकाशित केले.
। **मुद्रक** : व्यवस्थापक, बृहन्मुंबई महानगरपालिका मुद्रणालय, मुंबई. ।
(ही पुस्तिका मोफत आहे)
NS2835PRO-BMPP-76109-2025-26-100000 copies